




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

सोमवार दि. २६ जानेवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## णमोकारची पवित्र भूमी समाजाला प्रेरणा देणारी ठरेल:मुख्यमंत्री

(समर्थ गांवकरी)

नाशिक : मानवी मूल्य, मानवतेचा संदेश देणारी णमोकार भूमी समाजाला प्रेरणा देणारी ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

चांदवड तालुक्यात मालसाणे येथील णमोकार तीर्थ येथे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा व महामस्तकाभिषेक महोत्सव पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा व महाम स्तकाभिषेक महोत्सव संपन्न

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, प्रभू श्रीराम यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या भूमीत होणारा पंचकल्याणक महोत्सव धार्मिक अनुष्ठान नाही, तर देशाच्या प्राचीन, आध्यात्मिक, परंपरा, शांती, करुणा आणि साधनेच्या उत्सवाचे प्रतीक आहे. तीर्थकारांनी दिलेला अहिंसा, शांती आणि करुणेचा संदेश जैन बांधवासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.जग आज पर्यावरणाच्या समस्येशी संघर्ष करीत आहे. अशा परिस्थितीत जैन समाज प्राणीमात्रावर दया करण्याचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतो. समाजाचा विकास हा देशाच्या विकासाशी जोडला असल्याचा संदेशही जैन समाज देतो. याबरोबरच हा समाज सेवा कार्यातही पुढे आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासन मदत करीत असून परिसरात पायाभूत सोयीसुविधा आदी कामे झाली आहेत. उर्वरित कामासाठी सहकार्य करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.खासदार श्री. पटेल म्हणाले, चांदवड तालुक्यातील णमोकार हे महत्वाचे तीर्थ क्षेत्र ठरणार आहे. देशविदेशातील समाज बांधव येथे येतील. हे तीर्थ क्षेत्र मानव कल्याणासाठी मार्गदर्शक ठरेल. जैन समाज विविध उद्योग व्यवसायात आघाडीवर आहे. त्याप्रमाणे हा समाज सामाजिक कार्यात अग्रेसर आहे, असेही त्यांनी सांगितले.

समितीचे पदाधिकारी श्री. पंधारी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी णमोकार तीर्थक्षेत्राची पाहणी करून आचार्य मुनी यांच्याशी संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सहायक जिल्हाधिकारी कश्मिरा संख्ये, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, समितीचे पदाधिकारी संतोष पंधारी, कमल ठोलिया, विजय लोहाडी, डॉ. अतुल जैन, सुमेरसिंग काला, कीर्ती अजमेरा, माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल यांच्यासह आचार्य, समितीचे पदाधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

















-: स्थळ :-

जगप्रसिध्द रांजणखळगे ,पर्यटक विसावा केंद्र,निघोज

# रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार हा लोककलावंतांचा सन्मान : माजी मंत्री बाळासाहेब थोरात



(समर्थ गांवकरी)
**संगमनेर /प्रतिनिधी**

तमाशा ही महाराष्ट्राची जिवंत लोककला आहे. या क्षेत्रात अनेक चढ – उतार सुरू असताना देखील रघुवीर खेडकर यांनी आपले जीवन या कलेसाठी समर्पित केले. त्यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा राज्यभरातील तमाशासह सर्व लोककलावंतांचा सन्मान असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

कवी अनंत फंदी खुले नाट्यगृह येथे संगमनेर मधील सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल लोक कलावंत रघुवीर खेडकर यांचा भव्य नागरिक सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ.रावसाहेब कसबे, मा.आ. डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, उद्योगपती राजेश मालपाणी, सौ.दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, नूर मोहम्मद शेख, प्रा.एस.झेड.देशमुख, डॉ.सोमनाथ मुटकुळे, डॉ.संजय दळवी, हिरालाल पगडाळ,नामदेव गुंजाळ यांच्यासह रघुवीर खेडकर यांचे कुटुंबीय व संगमनेर मधील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, संगमनेरला कवी अनंत फंदी, लोकशाहीर विठ्ठल उमप, पवळा हिवरगावकर, गुलाबबाई संगमनेरकर, कांताबाई सातारकर आणि रघुवीर खेडकर यांच्यासह लोककलावंतांची मोठी परंपरा लाभली आहे. तमाशा ही महाराष्ट्राची जिवंत लोककला आहे. अनेक अडचणींवर मात करून ही लोककला पुढे नेण्याचे काम रघुवीर खेडकर यांनी केले आहे. १८५७ चा उठाव,भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा लढा आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही या लोककलाकारांचे मोठे योगदान राहिले आहे. कोरोना काळामध्ये रघुवीर खेडकर यांनी कलावंत सांभाळले. आज या मनोरंजन क्षेत्रात मोठी स्पर्धा झाली असून स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन आव्हाने पेलण्यासाठी रघुवीर खेडकर कायमसज्ज असतात त्यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा संगमनेर करांसाठी अभिमानास्पद असून ते आता देशाचे कलावंत झाले असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**■ संगमनेर हे माझे आईबाप – पद्मश्री रघुवीर खेडकर**
**■ संगमनेरकरांच्यावतीने रघुवीर खेडकर यांचा भव्य नागरिक सत्कार**

तर पद्मश्री रघुवीर खेडकर म्हणाले की, मला आजही वाटत नाही की हा पुरस्कार मला मिळाला आहे. महाराष्ट्रातील रसिकांचे प्रेम आणि संगमनेर करांचे आशीर्वाद माझ्यासाठी महत्त्वाचे आहे. संगमनेर ही माझी कर्मभूमी आहे आणि या संगमनेरचा मला कायम अभिमान आहे. खूप संघर्ष केला झगडलो. संगमनेरच्या मातीने मला संस्कार दिले. संगमनेर माझी आई आणि बाप आहे. वयाच्या नव्या वर्षी रंगमंचावर आलो आणि तिथून सोंगाड्या झालो माझ्या बहिणीने साथ. ही संगमनेरची भूमी आहे आज हा सोहळा पाहताना आई हवी होती असे सांगताना त्यांचे डोळे पाणावले.

तर डॉ.रावसाहेब कसबे म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेरच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला आणि लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हा समर्थ वारसा पुढे चालवला. रघुवीर खेडकर यांनीही लोककला जीवनाचा ध्यास म्हणून जपली. फक्त पुरस्कार देऊन भागणार नाही तर सरकारने तमाशांना आर्थिक अनुदान द्यावे अशी मागणी त्यांनी केली. तमाशा आणि प्रबोधनाचे काम केले असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अगोदर कांताबाई सातारकर आणि आता रघु भाऊ यांच्या पद्मश्री पुरस्कारासाठी प्रयत्न केले आणि त्यातून संगमनेरला हा पद्मश्री मिळाल्याने आपल्या सर्वांची मान उंचावली असे हि ते म्हणाले.

**रघु भाऊंचा रसिकांना दंडवत तर कुटुंबीयांचे डोळे पानावले**

लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य नागरी सत्कार सोहळ्यात पद्मश्री रघुवीर खेडकर यांना शिस्तबद्ध परेडने मानवंदना दिली. तर पुष्पवृष्टी करून त्यांचे व्यासपीठावर आगमन झाले. नटरंग उभा हे गीत सादर करून त्यांचा मोठ्या उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी रघु भाऊ खेडकर यांनी व्यासपीठावरून खाली येत सर्व रसिक प्रेक्षकांना दंडवत घालून अभिवादन केले. यावेळी खेडकर कुटुंबीयांची डोळे आनंद अश्रूंनी पानावले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, रघुवीर खेडकर यांचा पुरस्कार संगमनेर शहर आणि तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. तमाशा ही लोककला महाराष्ट्राची ओळख असून या पुरस्काराने तमाशा लोककलेचा गौरव झाला आहे. या पुरस्कारामुळे नवीन कलावंतांना प्रेरणा मिळणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी राजेश मालपाणी,एस.झेड.देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार सत्यजित तांबे यांनी केले सूत्रसंचालन डॉ.संतोष खेडलेकर यांनी केले तर डॉ.जयश्रीताई थोरात यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर मधील नागरिक, महिला विविध संघटनांचे पदाधिकारी व कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्री म्हणून संगमनेरात यावे**

सध्याच्या सरकारला कलेची जाण नाही. हे सरकार जनतेच्या मनातील नाही. येणारे सरकार हे बाळासाहेब थोरात यांचे असून मुख्यमंत्र्याच्या गाडीत बसून ते संगमनेरला येतील आणि त्यांना मुख्यमंत्री पाहिल्यानंतरच आपल्याला मरण येऊ अशी भावनिक साथ ज्येष्ठ विचारवंत प्रा. रावसाहेब कसबे यांनी घातल्यानंतर उपस्थित सर्वांनी त्यांना टाळ्यांच्या गजरात साथ दिली.

# महाशिवरात्रीतही भीमाशंकर मंदिर बंद विकासकामांना वेग देण्यासाठी प्रशासनाचा निर्णय

(समर्थ गांवकरी)
**मंचर प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे यंदा महाशिवरात्रीच्या कालावधीतही मंदिर भाविकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मंदिरात नित्यदर्शनासाठी प्रवेश बंद राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली.




नऊ जानेवारीपासून पुढील तीन महिने श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील मंदिर विकास कामांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी१२ फ ब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ महाशिवरात्रीला मंदिर उघडे राहील. असे जाहीर करण्यात आले होते. परंतु मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगड आणि इतर बांधकाम साहित्य आस्थाव्यस्त पडलेले असल्याने भाविकांना त्या माध्यमातून धोका होऊ नये यासाठी महाशिवरात्रीतही मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यादरम्यान मोठ्या संख्येने भाविक भीमाशंकर येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य शासनाने मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष आराखडा मंजूर केला आहे. गर्दी व्यवस्थापन, सुरक्षित प्रवेश–निर्गमन, पायरी मार्ग तसेच भाविकांसाठी सुसज्ज सुविधा उभारण्याचे काम वेगात सुरू आहे. जुन्या सभामंडपाचे क्षेत्र अपुरे पडत असल्याने नवीन भव्य सभामंडप उभारणीचे काम हाती घेण्यात आले असून सध्या मुख्य सभामंडप उतरविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्य, दगड व यंत्रसामग्री असल्याने भाविकांसाठी दर्शन सुरू ठेवणे सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. पावसाळ्यात कामे करणे कठीण असल्याने उपलब्ध कालावधीतच विकासकामे पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे भाविकांनी प्रशासनाच्या निर्णयाला सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष सुरेश कौदरे केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पोरकेपणा जाणीव : चेअरमन सत्यशील शेरकर

(समर्थ गांवकरी)
**शिवनेरी/प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पोरकेपणा जाणीव सर्व शेतकरी बांधवांना होत आहे . तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा हक्काचा माणूस हरपला असे भावनिक उद्गार शिरोली बुद्रुक येथे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशिल शेरकर यांनी अभिवादन करताना काढले.

ग्रामपंचायत कार्यालयातील आवारात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर व नागरिकांच्या उपस्थित करण्यात आले.

याप्रसंगी सरपंच प्रदीप थोरवे , उपसरपंच , सर्व ग्रामपंचायत सदस्य , गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी , कर्मचारी वृंद व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. या शोकसभा मध्ये उपमुख्यमंत्रीअजित दादांच्या आठवणींना उजाळा देण्यात आल्या . या गावांमध्ये स्वर्गीय माजी खासदार निवृत्तीशेठ बाबा शेरकर व स्वर्गीय चेअरमन सोपान शेरकर यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अजित पवार असल्यामुळे अनेक वेळा संस्थेचे सर्व संचालक व ग्रामस्थांनी अनेक वेळा संवाद व परिचय झाला होता. गावातील विकासासंदर्भात अनेक वेळा ग्रामस्थांचा सहभाग असल्यामुळे नागरिकांनी या शोकसभा मध्ये दुःख व्यक्त केले.

# सौ.सुकेशनी सुरेश कांबळे यांना राज्यस्तरीय त्यागमुर्ती माता रमाई समाजभूषण पुरस्कार प्रदान

(समर्थ गांवकरी)
**राजूर/सचिन लगड**

आदर्श गुणवंतांचा गौरव हा सत्याचा, त्यागाचा व ज्ञानाचा सन्मान असतो. याच भावनेतून शासकीय गेस्ट हाऊस सिन्नर येथे त्यागमुर्ती माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी उपेक्षीत लोकविकास महाराष्ट्र राज्य यांच्या वतिने अकोले तालुक्यातील मान्हेरे येथील सौ.सुकेशनी सुरेश कांबळे यांना राज्यस्तरीय त्यागमुर्ती माता रमाई समाजभूषण पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.सौ.सुकेशनी कांबळे यानी अनेक वर्षापासून धार्मिक,सामाजीक,शैक्षणीक, व सांस्कृतीक क्षेत्रात अवीरत समाजसेवा केली आहे.समाजामध्ये संस्कार, समाज जागृतीचे कार्य यापुढेही अवीरतपणे चालू रहावे यासाठी त्यांना पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. त्या मान्हेरे येथील ग्रामपंचायत सदस्य असून त्यांनी जनरल जागेतून बहुमत प्राप्त केले आहे. सीआरपी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती उमेद अभियान पंचायत समिती अकोले अंतर्गत ग्रामसखी, गावांतर्गत ३६ महिला स्वयंसहाय्यता समूहांचे संघटीकरण करून ग्रामसंघ स्थापन करून, महिलांना बँक कर्ज, उखत्र निधी, ठत्र निधी व व्यावसायिक प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण व बळकटीकरण, सामाजिक पिण्याच्या पाण्याची समस्या,आरोग्य, शिक्षण, शिवण क्लास, सुगंधी गौरी प्रशिक्षण व विविध प्रकारचे शिबिरे आयोजीत करून समाजसेवेचे कार्य केले आहे. व्यवसायिक लघुउद्योजिका असून स्वतःचा पापड व लोणचे व्यवसाय आहे. संचालक रतनगड ऑर्गानिक फार्मर प्रोडूसर कंपनी अकोले येथे संचालिका, अकोले तालुका उमेद महिला संघटनेच्या कोषाध्यक्षा, धान फाउंडेशन साक्षरता सखी,स्विच ऑन आणि इकोनेट संस्थामध्ये सक्रिय सहभाग आहे.तसेच त्या एक उत्कृष्ट गृहिणी आहेत.या सर्व कार्यांचा गौरव म्हणून सौ.सुकेशनी कांबळे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.त्यांच्या या यशाबद्दल पंचक्रोशीत सर्वत्र कौतूक व अभिनंदन होत आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष रघु साळवे हे होते.सचिव वसंत ढाकणे,खजिनदार प्रभाकर उघडे,सामाजीक कार्यकर्ते बाळासाहेब साबळे,कार्यक्रमाचे आयोजक व सुत्रसंचालक बाळासाहेब आव्हाढ,आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते सुरेशराव कांबळे,एसएमबीटी हॉस्पिटलचे बाळासाहेब हांडोरे,धीरज कांबळे, प्रेम कांबळे यांसह संपूर्ण आंबेडकरी समाज बहुसंख्येने उपस्थित होते.








# गजानन महाराजांची तपोभूमी असलेल्या इगतपुरी तालुक्यातील पंपा सरोवर येथे दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी

(समर्थ गांवकरी)
**इगतपुरी/भागीरथ आतकरी**

श्री संत गजानन महाराज यांची तपोभूमी असलेल्या इगतपुरी तालुक्यातील पंपासरोवर (बिटूर्ली ) येथे महाराजांचा प्रकट दिन आज रविवार रोजी मोठ्या धार्मिक उत्साहात साजरा झाला या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रकटदिनानिमित्त राज्यभरातून अनेक भाविकानि श्रीचे दर्शन घेण्यासाठी हजेरी लावली.

घोटीपासून कावनई मार्गावर चार किलोमीटर अंतरावर बिटूर्ली शिवारातील पंपा सरोवर येथे संत श्री गजानन महाराजाची तपोभूमी आहे .याच ठिकाणी संत गजानन महाराजांनी १२ वर्षे तपश्चर्या केली होती.असे धार्मिक ग्रंथामध्ये नमूद आहे , त्यामुळे या धार्मिक स्थळाला व तपोभूमिला विशेष महत्व आहे , श्रीक्षेत्र शेगाव येथील गजानन महाराज संस्थानच्या वतीने या शेगावच्या धर्तीवर विकासकामे हाती घेण्यात आली आहेत .

आज प्रकट दिनानिमित्त सकाळी ८ वाजता संत पूजन अभिषेक व जप याग हा धार्मिक कार्यक्रम व या पाठोपाठ आरती व महापूजा व दुपारी ११ वाजेपासून महाप्रसादाचा कार्यक्रम सुरु होता. यावेळी हजारो भाविकानी गजानन महाराजांच्या तपश्चर्या ठिकानाचे दर्शन घेतले.महाराजांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकानी व साधकानी गर्दी केली होती. गण गण गणात बोते या मंत्राचा अनेकांनी जप केला. अनेक साधक व श्रभाविकानी अभिषेक केला. या प्रकटदिनासाठी मुंबई,ठाणे, नगर, पुणे, जळगाव, शेगाव, नाशिक जिल्हा येथील भाविकानी तसेच इगतपुरी– त्र्यम्बकेश्वर तालुक्यांतील भाविकांनीही मोठ्या प्रमाणात हजेरी लाउन् गजानन महाराजांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.या प्रकटदिनासाठी सेवा देण्यासाठी व नियोजनासाठी शेगाव येथील अनेक सेवकांनी सेवा दिली. सेवा देणाऱ्या सेवकांच्या नियोजनामुळे भाविकांनी समाधान व्यक्त करुन सेवकांच्या सेवेचे कौतुक केले.

इगतपुरी येथूनही आज सकाळीच इगतपुरी ते तपोभुमी अशी १५ किमीची पायी पालखी काढण्यात आली या पदयात्रा व पालखी सोहळ्यात शेकडो भाविक,महिला सहभागी झाले होते. तसेच जनसेवा प्रतिष्ठानचे भाविकही पालखी घेऊन पंपासरोवर येथे दर्शनासाठी दाखल आहे.


# शिवदासशेठ नानाशेठ खैरनार यांचे निधन

(समर्थ गांवकरी)
**डेडियापाडा/प्रतिनिधी**

डेडियापाडा येथील कै.शिवदासशेठ नानाशेठ खैरनार यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने खैरनार कुटुंबाचा आधारवड हरपला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

कै. शिवदासशेठ खैरनार हे शांत, संयमी आणि अत्यंत कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व होते. आयुष्यभर त्यांनी प्रामाणिकपणा, परिश्रम आणि संस्कार यांना सर्वोच्च स्थान दिले. घरातील मोठा म्हणून त्यांनी नेहमीच समंजस भूमिका घेत कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला. मतभेदांवर संवादाने तोडगा काढणे, सर्वांना सोबत घेऊन चालणे, हीच त्यांची जीवनशैली होती.

ते स्व. नरेश शिवदास खैरनार व श्री. किशोर शिवदास खैरनार यांचे वडील होत.



त्यांच्या पश्चात मुलगे, सुना, मुली, नातवंडे असा मोठा व सुसंस्कृत परिवार आहे. त्यांनी रुजवलेले संस्कार आज त्यांच्या पुढील पिढीत स्पष्टपणे दिसून येतात. कै. शिवदासशेठ खैरनार यांचे कौटुंबिक व सामाजिक संबंध व्यापक होते. ते परिवर्धे येथील श्री. रतिलाल रामदास शिंपी यांचे व्याही असून, कल्याण येथील डॉ. मनिलाल रतिलाल शिंपी यांच्या मोठ्या बहिणीचे सासरे होत. महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही राज्यांत त्यांना मान व आदराची वागणूक मिळत असे. प्रसिद्धीपासून दूर राहून माणुसकी जपणारे हे व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून निघून गेले असले, तरी त्यांनी दिलेले संस्कार, आठवणी आणि मूल्ये कायम स्मरणात राहतील.

त्यांचा अंत्यविधी रविवार, दिनांक ८ फ ब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डेडियापाडा येथील स्मशानभूमीत पार पडला.यावेळी नातेवाईक, मित्रमंडळी, राजकीय , सामाजिक सांस्कृतिक कार्यकर्ते यांनी देखील उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# आंबेगाव तालुक्यात शांततेत मतदान; ६५.३ टक्के मतदानाची नोंद

(समर्थ गांवकरी)
**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट आणि १० पंचायत समिती गणांसाठी एकूण २३९ मतदान केंद्रांवर मतदान आकडेवारीनुसार ९३,१८९ पुरुष मतदारांपैकी ६३,७२८ पुरुषांनी, ९०,८५७ महिला मतदारांपैकी ५६,४५३ महिलांनी तसेच ६ तृतीयपंथी मतदारांपैकी १ मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावला.याप्रमाणे एकूण मतदानाची टक्केवारी सुमारे ६५.३ टक्के इतकी नोंदविण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश थेटे, तहसीलदार डॉ.सचिन वाघ, नायब तहसीलदार सचिन मुंढे ,अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडली.या निवडणुकीसाठी जॉइंट कमिशनर पीएमआरडीए पूनम मेहता या मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान पथके शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे स्थापन करण्यात आलेल्या संकलन केंद्रात सुरक्षितरीत्या परतली. मतदानानंतर सर्व ईव्हीएम व मतदान साहित्य शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथील स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आले असून शनिवार दि.७ रोजी रात्री १०.३० वाजता राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम सील करण्यात आले. जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव–२०२६ निवडणुकांची मतमोजणी सोमवार, दि. ९ रोजी सकाळी १० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी सांगितले.

# दिल्ली ते मुंबई 'हिंदायान सायक्लोथॉनला' महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी दाखविला हिरवा झेंडा

(समर्थ गांवकरी)
**संतोष पडवळ/प्रतिनिधी**

ठाणे ता ८ : भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय तसेच संरक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने दिल्लीपासून ३० नोव्हेंबर रोजी सुरू झालेली हिंदायान सायक्लोथॉन आज ठाणे येथून मुंबईकडे निघाली. या सायक्लोथॉनला महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील यांनी महापालिका भवन येथे हिरवा झेंडा दाखवून सायकलस्वारांना शुभेच्छा दिल्या. या हिंदयान सायक्लोथॉनमध्ये उत्स्फूर्तपणे सायकलप्रेमी सहभाग घेतला. तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील सायकलस्वारांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. महिलांचा सहभागही मोठ्या प्रमाणात असल्याने या उपक्रमाला अधिक बळ मिळाले. महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांनी सायकलप्रेमींना शुभेच्छा दिल्या. त्यांनी प्रत्येक सायकलस्वाराशी संवाद साधत त्यांच्या अनुभवांबाबत जाणून घेतले.



भारतात सायकलिंगला शाश्वत, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक वाहतूक माध्यम म्हणून प्रोत्साहनदेणे हा या मागचा उद्देश आहे , दिल्लीपासून सुरू झालेला हा प्रवास ठाण्यातून मुंबईपर्यंत पोहोचत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.असे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. उपमहापौर कृष्णा पाटील यांनी 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत या सायक्लोथॉनचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, सायकलिंग हा उत्तम व्यायाम असून तो शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमता वाढवतो. भविष्यात अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढला पाहिजे असेही ते म्हणाले.

ठाणे महानगरपालिकेपासून सुरू झालेल्या सायक्लोथॉनचा कुलाबा मिलिटरी स्टेशन, मुंबई येथे समारोप झाला. यावेळी मेजर सागर सावंत यांच्या हस्ते प्रत्येक सायकलप्रेमींना आकर्षक पदक देऊन गौरविण्यात आले. यावेळी विष्णुदास चापके यांनी या सायक्लोथॉन आयोजना मागील उद्देश स्पष्ट करत भविष्यात अधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी हिंदायान फाऊंडेशनचे प्रमुख विष्णुदास चापके, आम्ही सायकल प्रेमी फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, सदस्य अमोल कुळकर्णी, ठाणे महानगरपालिकेच्या प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहाचे कर्मचारी उपस्थित होते.

# कोतुळ–पांगरी शिवारात जेलीटीन स्फोटाचा दगड डोक्यात पडून कामगाराचा मृत्यू!

(समर्थ गांवकरी)
**कोतुळ (प्रतिनिधी)**

कोतुळ–पांगरी शिवारात विहीर खोदकाम सुरू असताना जेलीटीनच्या स्फोटात उडालेला दगड डोक्यात लागून कोपरगाव तालुक्यातील एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी घडली.

मयत कामगाराचे नाव नितीन धोंडीराव थोरात (वय ३७, रा. रांजणगाव, ता. कोपरगाव) असे आहे. पांगरी शिवारात त्र्यंबक दगडू काळे यांनी आपल्या बंधू सुखदेव डोंगरे यांच्या शेतातील विहीर खोदण्याचे काम राहुरी तालुक्यातील विजय आढाव या ठेकेदाराला दिले होते. गेल्या आठ दिवसांपासून एल.आर. पोकलेन मशीनच्या सहाय्याने विहीर खोदण्याचे काम सुरू होते.

शनिवारी दुपारी सुमारे दोन ते अडीचच्या सुमारास विहिरीतील दगड फोडण्यासाठी जेलीटीनचा स्फोट घडवून आणण्यात आला. यावेळी स्फोटामुळे उडालेला दगड दूर अंतरावर थांबलेल्या नितीन थोरात यांच्या डोक्यात जोरात लागला. त्यामुळे ते रक्ताच्या थारोळ्यात कोसळले आणि जागीच मृत्यू झाला.




जखमी अवस्थेत कामगाराला तातडीने कोतुळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच अकोलेचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी पुढील तपास सुरू असून जेलीटीन वापराबाबतची परवानगी व सुरक्षिततेच्या उपाययोजनांची चौकशी केली जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांचा वाढदिवस

# निश्चयाचा महामेरू : बहुत जनांसी आधारू



भारतीय राजकारणात अनेक नेत्यांना व राज्यकर्त्यांना आपल्या वाडवडीलांचा- पूर्वजांचा राजकीय वारसा लाभून ते सहजपणे सत्तास्थानी विराजमान झालेत. मात्र शिवरायांच्या सातारचा एकनाथ हे त्याला अपवाद आहेत. त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने शून्यातून विश्व निर्माण केलं. त्यांचा नगरसेवक ते मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री हा यशस्वी राजकीय प्रवास नवोदित युवा नेत्यांसाठी खचितच पथदर्शक ठरणारा आहे. खरं तर, हीच त्यांच्या यशस्वी राजकीय प्रवासाची यशगाथा होय. मित्रहो, अनाथांचे नाथ- एकनाथ या सातारच्या सुपुत्रानं शिवछत्रपतींच्या कर्मभूमीची माती ललाटी लावून, काही तरी करून दाखवावं या उद्देशाने ठाणे या सांस्कृतिक नगरीत पदार्पण केलं अन् बघता बघता त्यांच्या जीवनास मोठी कलाटणी मिळाली. या शाश्वत घटनेला समस्त ठाणेकर साक्षीदार आहेत. एकनाथजी यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९६४ रोजी वंदनीय गंगूबाई : आईसाहेब यांच्या उदरी झाला, अन् जणू गोरगरीब, कष्टकरी लोकांचा आश्रयदाता उदयास आला. भाईंच्या वडिलांचे नाव संभाजीराव तर, महाबळेश्वर तालुक्यातील दरे हे त्यांचं मूळगाव. शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल, परखड अन् ओजस्वी वाणीनं प्रेरित होऊन, तर धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या भगव्या विचाराच्या शिकवणीने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच त्यांनी शिवसेनेचा भगवा ध्वज हाती घेतला आणि बघता-बघता त्यांचं राजकीय-सामाजिक- आध्यात्मिक जीवन भगवामय झालं. वंदनीय बाळासाहेब ठाकरे अन् धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचे भगवे हिंदुत्व अन् राजकारणातून समाजकारण करणं या द्वय तत्त्वांचा अंगिकार करून राज्यातील गोरगरीब, गरजू, कष्टकरी, अल्पभूधारक शेतकरी, काम गार, दिव्यांग : महिला, सुशिक्षित बेरोजगार व मागास जनजातीच्या लोकांसाठी हिताच्या विविध योजना राबवून त्यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

परंतु दुर्दैवानं एक काळा दिवस उजाडला. अन् २००१ मध्ये दिघेसाहेबांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू होऊन ठाणेकरांवर दुःखाची अवकळा पसरली. संपूर्ण ठाणे शहर सुन्न झालं. प्रत्येकाला आपल्या घरातील थोरली व्यक्ती गेल्याचे दुःख झालं. त्यानंतर शिवसेनाप्रमुखांनी ठाणे जिल्हा प्रमुखाची जबाबदारी शिंदेसाहेबांना सोपविली. ठाणे जिल्हा शिवसेना प्रमुख पदाचं उत्तरदायित्व यांच्या हाती आलं. गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे यांचा वारसा पूर्णक्षमतेचे चालवत, सर्वांना बरोबर घेऊन मोठ्या आत्मविश्वासाने एकनाथजी राजकारणातून समाजकारण करत आहेत, म्हणजे हीच खरी स्व. दिघे साहेबांना मानवंदना होय. महाराष्ट्र- बेळगाव प्रश्नाचे गांभीर्य पहाता, त्यांची समन्वयक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदर आंदोलनाचे नेतृत्व करतेवेळी त्यांनी बेल्लारी तुरुंगात ४ महिने



कारावास भोगला. त्यांच्या संयम, साहस व संघर्षाचे हे प्रतिक होय.

म्हणतात ना, हर कामियाब इंसान के पीछे औरत का हाथ होता है हे विधान शिंदेसाहेबांच्या बाबतीत तंतोतंत खरं ठरलं आहे. शिंदेसाहेबांच्या पत्नी सौ. लताताई शिंदे ह्या सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहून त्यांच्या सुख-दुःखाच्या वाटेकरीही राहिल्या आहेत. सौ. लताताई ह्या खऱ्या अर्थानं शिंदेसाहेबांच्या जणू सावलीच. त्यामुळे शिंदे साहेबांचे मनोबल वृद्धिंगत होत गेले. आपला सुपुत्र श्रीकांत यास डॉक्टर बनविण्याचं स्वप्नही लताताईंनी कठोर परिश्रम घेऊन खरं करून दाखविलं. यास्तव आम्ही शिवसैनिक सौ. लताताईंना आई म्हणून वंदन करतो.

कोरोना महामारीमुळे सारं जग मोठ्या संकटात सापडले असता, नगरविकास मंत्री या नात्याने शिंदेसाहेबांनी ठोस उपाययोजना करून ठाणे व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कोरोनाला नियंत्रित करण्यात यश मिळविलं. कोरोना काळातील भाईंनी केलेली रुग्णसेवेची कामे राज्यातील सर्वधर्मीय लोकांच्या आजही स्मरणात आहेत. सुरुवातीच्या काळात पुरेशा आरोग्य सुविधा नव्हत्या,कारण या महामारीवर कोणतीही लस वा औषध जगात उपलब्ध नव्हतं. ना. शिंदेसाहेबांच्या संकल्पनेतून साकारलेल्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन या द्वय सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून राज्यातल्या सर्वधर्मीय लोकांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. तसेच कोरोनाविषयक जनजागृती करून लोकांना राज्य सरकारच्या नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यास प्रवृत्त केलं. त्यामुळे लोकांनी सावधगिरी बाळगून स्वतःची व आपापल्या कुटुंबांची काळजी घेतली.

आतामितीपर्यंत राज्यातील विविध भागांम ध्ये सुमारे एक हजाराहून अधिक आरोग्य शिबिरे आयोजित केल्याने लाखों लोकांनी या शिबिरांचा लाभ घेतला. त्यामुळे कोरोना काळात लोकांच्या आरोग्याचे खऱ्या अर्थाने रक्षण झाले. या महत्वपूर्ण कार्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक प्रमुख मंगेश चिवटेसर, कक्षाचे राज्य प्रमुख रामहरी राऊत व सहप्रमुख ज्ञानेश्वर धुळगंडे आणि मदत कक्षाच्या टीमचे मोठं योगदान लाभलं असून, रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ब्रीद त्यांनी कृतीनं खरं करून दाखविलं, याचा आम्हा तमाम शिवसैनिकांना सार्थ अभिमान आहे. कार्य सम्राट अन् विकास पुरुष म्हणून जनमानसात ओळख असलेल्या भाईंनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सरकारी कार्यालयात साजरी करण्याचा निर्णय घेतला. राज्यात सर्वधर्मसमभाव प्रस्थापित करताना त्यांनी आपला हिंदुत्व बाणा कायम तेवत ठेवला आहे. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत जय जय महाराष्ट्र माझा या गौरवशाली गाण्याला त्यांनी राज्यगीताचा दर्जा दिला. उल्लेखनीय गोष्ट राजकारणातून समाजकारण करताना त्यांनी आपली हिंदुत्वाशी नाळ कायम ठेवली. या पार्श्वभूमीवरच योगगुरू रामदेवबाबा यांनी एकनाथजींवर हिंदूधर्माचे गौरवपुरुष म्हणून स्तुतीसुमने वाहिली. समृद्धी महामार्ग हा ड्रीम प्रोजेक्ट सार्वजनिक बांधकाम मंत्री या नात्याने शिंदेसाहेबांनी या प्रकल्पाची उभारणी जलदगतीने व्हावी, या उद्देशाने अधिक लक्ष घातले आहे. यावर सुमारे ५५ हजार कोटी रुपये अंदाजित खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे १० जिल्हे,२६, तालुके अन् ३९३ खेडींची दळणवळणाची मोठी सोय झाली आहे. हा प्रोजेक्ट राज्यातील लोकांना वरदान ठरला आहे. त्यामुळे अवघ्या ८ तासात मुंबई-नागपूर अंतर पार करता येत आहे. त्यास वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले आहे. वास्तवात हीच खरी ना. एकनाथ शिंदेसाहेबांच्या कारकिर्दीची विकासगाथा होय. शिंदे सरकारचा सर्वात महत्वाकांक्षी निर्णय म्हणजे स्त्रियांना वयाची अट न ठेवता, एस टी बसने अर्ध्या तिकीटावर प्रवास सवलत तर, ७५ वर्षांवरील वृद्धांना एस.टी. प्रवास मोफत करण्याची मुभा दिल्याने त्यांना तीर्थयात्रा करणं सुकर झालं आहे. त्याची परिणिती म्हणजे स्त्रिया अन् ज्येष्ठ नागरिकांची एस.टी. ने प्रवास करणाऱ्यांची संख्या अनेक पटीने वाढली आहे. यास्तव विविध संघटना / सेवाभावी संस्थांनी शिंदेसाहेबांना धन्यवाद दिले आहेत. ठाणे शहरातील धोकादायक अन मोडकळीस आलेल्या इमारतींतल्या लोकांचे जीवन सुरक्षित करून त्यांना त्यांच्या हक्काचे घर देण्यासाठी नगर विकास मंत्री या नात्याने त्यांच्या प्रयत्नांतून क्लस्टर डेव्हलपमेंट योजना कार्यान्वित करण्यात आली. त्यासाठी सिडको व ठाणे महापालिका यांच्यातसामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. गेली दोन दशके क्लस्टर योजनेसाठी जो लढा दिला, त्याचीफलश्रुती आहे, असे विधान शिंदे साहेबांनी यांप्रसंगी केले. या महत्वाकांक्षी योजनेमुळे सुमारे ८ ते १० लाख ठाणेकरांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळून, त्याचे नवे व सुंदर घर मिळण्याचे स्वप्न साकार होईल, हे निश्चित. कृतज्ञतेच्या भावनेतून येथील रहिवाश्यांनी अनाथांचे नाथएकनाथ यांचे आभार मानले. माननीय एकनाथजी शिंदे हे खऱ्या अर्थाने देवदूत म्हणवतात. कारण राज्यात कोठेही नैसर्गिक आपत्ती आली वा अपघात झाला, तेथे ते देवदूतासारखे धावून जातात. विशेष म्हणजे ते गोरगरीब लोकांच्या आरोग्याचे रक्षणकर्ते आहेत. शिंदे पिता-पुत्राने लोकोपयोगी कामांच्या व संघटन कौशल्याच्या जोरावर अनुक्रमे विधानसभाव लोकसभेच्या निवडणुकीत मोठा विजय संपादन केला. ना.शिंदेसाहेबांनी कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून सलग ५ वेळा तर, डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघातून सलग १३ वेळा मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून आपली राजकीय योग्यता सिद्ध केली. यास्तव शिंदे पिता पुत्राचे मनस्वी अभिनंदन अन् पुढील वाटचालीसाठी भगव्या शुभेच्छा!

गेल्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ना.एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यम ातून ५१,०००हून अधिक गोरगरीब, निर्धन, गरजू लोकांच्या महागड्या शस्त्रक्रियेंसाठी ३१७ कोटीहून अधिक अर्थसहाय्य अदा केलं, ही अद्वितीय व अतुलनीय गोष्ट असून, आरोग्य क्षेत्रात एक विक्रम प्रस्थापित केला आहे, असे अभिमानाने म्हणावे लागेल. याशिवाय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या उपक्रमाअंतर्गत राज्यात ७०० दवाखाने सुरू करण्याचा शिंदेसाहेबांचा मानस आहे. ठाणे-मुंबई जिल्ह्यात आज शेकडो आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. त्याचा

आजमितीपर्यंत लाखों लोकांनी लाभ घेतला आहे. महात्मा ज्योतिराव फुले

जनआरोग्य योजनेअंतर्गत असंख्य गोरगरीब लोकांना महागडे ऑपरेशन करण्यासअर्थसहाय्य प्राप्त झालं आहे. आता पांढऱ्या रेशन कार्डधारकांना देखील या योजनेचा लाभ मिळत आहे. त्यामुळे गरजू रुग्णांमध्ये जगण्याची एक नवी उमेद निर्माण झाली आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यातील गोरगरीब, निर्धन लोकांच्या सुमारे ५,६०० लहान मुला-मुलींच्या हृदयावरील छिद्राचे ठाण्याचे सुप्रसिद्ध ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करून दिल्या आहेत. त्यामुळे ती मुलं आता निरोगी जीवनाचा श्वास घेत सुदृढ जीवन जगत आहेत. याशिवाय कोरोना काळात रुग्णांची ने-आण करणं सुकर व्हावं, या उद्देशाने डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्यावतीने राज्यात सुमारे ३०० रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. खऱ्या अर्थाने ही आरोग्य क्षेत्रातली क्रांतीच म्हणावी.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन,आरोग्यदूत फाउंडेशन तथा रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या षष्ट्यब्धि निमित्त राज्यात एकनाथ हिरक आरोग्य वर्ष साजरा केलं जात आहे. अतः या

वर्षादरम्यान ६०० लहान मुलांच्या हृदयावर मोफत शस्त्रक्रिया; ६०० दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप: ६० महाआरोग्य शिबिराचे आयोजन; ६० हजार नागरिकांचे मोफत आरोग्य तपासणी; ६० हजार नागरिकांना मोफत चष्मे वाटप; ६० हजार नागरिकांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया; ६० हजार किलोमीटरची आरोग्य संपदा यात्रा; ६० हजार वृक्षांची लागवड आणि ६० हजार रक्तपिशवींचे संकलन संकल्प हे उपक्रम राबविले जात आहेत.

ना. एकनाथजी शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत ऐन विधानसभा निवडणुकींच्या आधी मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना राबवून आपली राजकीय परिपक्वता सिद्ध केली. गत लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला होता. त्याचा वचपा काढत शिंदेसाहेबांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकींमध्ये प्रचंड विजय संपादन करून महाविकास आघाडीचा दारुण पराभव केला. या अभूतपूर्व विजयश्रीचे श्रेय बहुतांशी शिंदे साहेबांना जाते. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्वधर्मीय महिलांना माहे १५०० रुपये अर्थसहाय्य देऊन त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. सदर अर्थसहाय्याच्या मदतीने राज्यातल्या माता-भगिनी छोटाखानी उद्योग करून स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. राज्यातील सुमारे २ कोटी ४१ लाख एवढ्या गोरगरीब, गरजू महिलांना या योजनेचा लाभ मिळाला. यास्तव भगिनींनी शिंदेसाहेबांना भाऊरायाची उपमा देऊन त्यांचे मन:पूर्वक आभार मानत, त्यांना बहिणीच्या नात्याने भरभरून राख्या बांधल्या. यालाच खऱ्या अर्थानं राजकारणातून सम ाजकारण करणं म्हणतात. राज्यातील गोरगरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे घरकुल, शिक्षण, रोजगार- स्वयंरोजगार, आरोग्य हे मूलभूत प्रश्न शिंदेसाहेबांनी मार्गी लावले आहेत, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. त्याचप्रम ाणे बळीराजाच्या कृषी वीजपंपाचे बिलं माफ करण्यात आली आहेत. अतिवृष्टी अन् गारपिटीम ुळे शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी अर्थसहाय्य देण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. शिंदेसाहेबांच्या प्रयत्नातून वारकरी मंडळांना प्रत्येकी २० हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात सुरुवात झाली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तीर्थ यात्रा करण्यास जाण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे. याबद्दल वारकरी संस्थांकडून शिंदेसाहेबांचे मनस्वी आभार! उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांना सम स्त वारकरी संस्थांतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! आपले राजकीय जीवन अधिकाधिक उज्ज्वल होवो. आपणास आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभो ही आई जगदंबे चरणी प्रार्थना! आदरणीय शिंदेसाहेबांसाठी खास ह्या दोन ओळीतून थकेगा कभी..तून रुकेगा कभी..तून मुड़ेगा कभी, कर शपथ.. कर शपथ, अग्निपथ..अग्निपथ! जय हिंद ! जय महाराष्ट्र!

लेखक - रणवीर राजपूत
गवर्नमेंट मिडिया, महाराष्ट्र शासन
(निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी)
(मो.न. ९९२०६७४२१९ )
दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ
विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई



कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची कन्या पूर्वा हिचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात व थाटामाटात पार पडला. प्रसंगी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील व इतर मान्यवरांनी उपस्थित राहून नवदाम्पत्याला भावी वाटचालीस शुभेच्छा व नवदामत्यास आशीर्वाद दिले.
(फोटो - संतोष पडवळ )

## प्रभाग क्रमांक ७ मधील नागरी समस्या तातडीने सोडवाव्यात

### नगरसेवक अमित शेळके यांची नगरपरिषदेला मागणी

(समर्थ गांवकरी)
**शिर्डी /प्रतिनिधी**

शिर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये अंगणवाड्या, रस्ते, उद्याने तसेच पाणीसाचण यांसारख्या गंभीर नागरी समस्या निर्माण झाल्या असून त्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी नगरसेवक अमित शेळके पा. यांनी शिर्डी नगरपरिषदेला निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख मुद्द्यांनुसार, माळीनगर परिसरातील अनेक अंगणवाड्या अत्यंत खराब अवस्थेत आहेत. इमारतींच्या भिंतींना तडे गेले असून पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नाही. तसेच अस्वच्छतेमुळे लहान मुलांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

रिंग रोडपासून नगरपरिषदेच्या ताब्यातील



उद्याने सध्या बंद अवस्थेत असून, ती नागरिकांसाठी तातडीने खुली करावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय माळीनगर-बायपास रोडवरील हॉटेल पल साई समोरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून त्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

प्रभागात अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून गवत व झुडपांची वाढ झाली आहे. परिणामी डासांचा प्रादुर्भाव वाढून डेंग्यू व म लेरियासारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. यासाठी तातडीने साफसफाई, फवारणी व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

प्रभागातील सर्व समस्या सोडवण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन नगरसेवक अमित शेळके यांनी दिले असून, नगरपरिषदेकडून त्वरित व सकारात्मक कारवाईची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.




दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनी मधील मातोश्री सदन इमारती म धील शॉप क्र १३ मध्ये श्री सोनी यांच्या नवीन कन्हया ज्वेलर्सचे उदघाट्न मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. ( फोटो - संतोष पडवळ )

# विश्वस्त संस्थेच्या कारभारावर गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न; विश्वस्त मंडळाचा खुलासा

(समर्थ गांवकरी)

**नाशिक कळवण रवींद्र आहेर**

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, श्री सप्तशृंगगड या प्रतिष्ठित धार्मिक व सामाजिक संस्थेबाबत काही व्यक्तींमार्फत जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असून, यासंदर्भात विश्वस्त मंडळाने अधिकृत प्रेसनोटद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

विश्वस्त मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, संस्थेच्या प्रशासनाबाबत काही तक्रारदारांनी विविध माध्यमांतून दिशाभूल करणारी, गैरसमज पसरवणारी व संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहोचवणारी माहिती प्रसारित केली आहे. यामुळे भाविकांमध्ये व नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, हा प्रकार अत्यंत दुर्दैवी असल्याचे विश्वस्त मंडळाने नमूद केले आहे.

**तक्रारीनंतरही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण**

सप्तशृंगगड येथील ग्रामपंचायत सदस्य सौ. बेबीबाई गोविंद जाधव व श्री. छान गोविंद जाधव यांनी दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी विश्वस्त संस्थेविरोधात गंभीर आरोप करत तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीनंतर विश्वस्त संस्थेने कोणतीही टाळाटाळ न करता तात्काळ कायदेशीर प्रक्रिया सुरू केली.

तक्रारदारांनी दिनांक २१ ऑगस्ट २०२६ पासून विश्वस्त संस्थेच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. यानंतर तक्रारीतील मुद्द्यांवर चर्चा, चौकशी व पारदर्शक निर्णयासाठी दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी विश्वस्त संस्थेच्या त्रिसदस्य समितीची स्थापना करण्यात आली होती.

**त्रिसदस्य समितीची पुनर्गठन व सर्वसमावेशक प्रक्रिया**

तक्रारदारांच्या लेखी मागणीनुसार दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ रोजी त्रिसदस्य समितीचे पुनर्गठन करण्यात आले. या समितीत प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, ज्येष्ठ महिला सरकारी वकील तसेच तक्रारदारांचा एक प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला. याबाबत तक्रारदारांना लेखी स्वरूपात कळविण्यात आले होते.

**तक्रारदारांकडून वारंवार नव्या मागण्या**

प्रेसनोटमध्ये नमूद केल्याप्रमाणे, तक्रारदारांनी त्यांच्या मूळ तक्रारीशी संबंधित नसलेल्या विविध बाबींबाबत अतिरिक्त मागण्या केल्या. व्यवस्थापकांच्या



निलंबनाची मागणी, वारंवार समिती पुनर्गठन, तसेच अपोषण पुन्हा सुरू ठेवण्याचे निर्णय घेण्यात आले.

विशेष म्हणजे, दिनांक २९ ऑगस्ट २०२६ नंतर तक्रारदारांनी वेगवेगळ्या दस्तऐवजांची मागणी सुरू केली होती. मात्र, या सर्व बाबी नियमानुसार त्रिसदस्य समितीमार्फत व संस्थेच्या घटनेनुसारच हाताळल्या जातील, असे विश्वस्त मंडळाने स्पष्ट केले आहे.

**बदनामी व चुकीच्या बातम्यांवर कारवाईचा इशारा**

विश्वस्त संस्थेने स्पष्टपणे नमूद केले आहे की, संस्थेचा कारभार पूर्णतः कायदेशीर, पारदर्शक व नियमांनुसार सुरू आहे. जाणीवपूर्वक चुकीच्या बातम्या पसरवून संस्थेची बदनामी करणाऱ्यांविरोधात आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**भाविकांना व नागरिकांना आवाहन**

विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी भाविक, नागरिक व माध्यमांना आवाहन केले आहे की, अफवांवर किंवा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये. कोणतीही अधिकृत माहिती केवळ विश्वस्त मंडळाकडूनच स्वीकारावी. श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टचा कारभार पूर्वीप्रमाणेच श्रद्धा, नियम व कायद्याच्या चौकटीत पारदर्शक पद्धतीने सुरू राहील, असा विश्वास विश्वस्त मंडळाने व्यक्त केला आहे.

# लहान येथे अखंड हरी नाम सप्ताहला सुरुवात

(समर्थ गांवकरी)
**अर्धापूर प्रतिनिधी**

तालुक्यातील लहान गाव हे सामाजिक कार्याबरोबर धार्मिक कामा मध्ये सदा अग्रेसर असून प्रतिवर्षा प्रमाणे सलग २४ व्या वर्षी अखंड हरी नाम सप्ताहास सुरूवात झाली. पंचक्रोशीतील बहुचर्चित असलेला गावातील एकतेचा धार्मिक सोहळा म्हणून अखंड हरिनाम सप्ताहा लहान सह परिसरात ओळखला जातो. सप्ताहाच्या दैनंदिन धार्मिक कार्यक्रमामध्ये पहाटे चार ते सहा काकडा भजन आरती,सकाळी सात ते आठ महादेव रुद्राभिषेक,सकाळी दहा ते बारा आणि दुपारी तिन ते पाच श्रीमद् भागवत कथा,सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ,रात्री आठ ते अकरा हरिकीर्तन नंतर जागर भजन होणार आहे.दि.८ फेब्रुवारी पासून निरंतर सात दिवस श्रीमद् भागवत कथा ह.भ.प. भागवतचार्य राजेश्वर महाराज परळीकर यांच्या अमृत वाणीतून व्यक्त केली जाईल..

नित्यकीर्तना मध्ये दि.८ रोजी ह.भ.प.रामचंद्र महाराज सारंग,दि.९ रोजी ह.भ.प.अशोक महाराज तळणीकर,दि.१० रोजी ह.भ.प.बबन महाराज मुडीकर,दि.११ रोजी ह.भ.प.माणिक महाराज रेंगे,दि.१२ रोजी ह.भ.प.उमेश महाराज आळंदीकर,दि.१३ रोजी ह.भ.प.जय महाराज सरनाईक,दि.१४ रोजी ह.भ.प.माऊली महाराज शिदगीकर,दि.१५ रोजी

ह.भ.प.गुरुवर्य अच्युत महाराज

दि.१६ रोजी ह.भ.प.वैराग्यमूर्ती बाबुरावजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. हा धार्मिक सोहळा आठ फेब्रुवारी ते सोळा फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. तेव्हा पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी लाभ घेण्याचे आव्हान पूजेचे मानकरी आनंद काळे व समस्त गावकरी मंडळी लहान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्रीडा महोत्सवात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# सुदृढ आरोग्यासाठी खेळ अत्यावश्यक : मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव

(समर्थ गांवकरी)

**ठाणे/जिल्हा परिषद**

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी दोन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन दि. ७ व ८ फब्रुवारी २०२६ रोजी लोधा वर्ल्ड स्कूल, ऑलिंपिक स्पोर्ट्स सेंटर, पलावा सिटी, कल्याण येथे उत्साहात पार पडले. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव व आरोग्य विभागातील युवा खेळाडू दशरथ शिंगळे यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आले.







या दोन दिवसांच्या क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विविध सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांमुळे परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून सुदृढ आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी यावेळी केले. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दैनंदिन काम काजाच्या धावपळीतून वेळ काढून शारीरिक स्वास्थासाठी खेळांची आवड जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

क्रीडा महोत्सवात सर्वोत्कृष्ट सांघिक कामगिरीबद्दल शहापूर तालुक्याला सर्वोत्कृष्ट संघाचा मान मिळाला. विविध स्पर्धांमधील विजेते पुढीलप्रमाणे –

कबड्डी पुरुष – शहापूर तालुका
कबड्डी महिला – कल्याण तालुका
खो-खो पुरुष – भिवंडी तालुका
खो-खो महिला – शहापूर तालुका
क्रिकेट पुरुष – मुरबाड तालुका
बॉक्स क्रिकेट महिला – भिवंडी तालुका
लंगडी – शहापूर तालुका
रस्सी खेच पुरुष – शहापूर तालुका
रस्सी खेच महिला – अंबरनाथ तालुका
व्हॉलीबॉल – शहापूर तालुका

विजेते संघांनी हलगीच्या तालावर ठेका धरत आनंदोत्सव साजरा केला. या क्रीडा महोत्सवाचे नियोजन पंजाब नॅशनल बँक यांच्या सौजन्याने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग पद्माकर लहाने, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, प्रकल्प संचालक जलजीवन मिशन पंडीत राठोड, जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे, सर्व तालुकास्तरीय गट विकास अधिकारी, विभाग प्रमुख तसेच मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, बॉक्स क्रिकेट, लंगडी, रस्सीखेच, हॉकी, व्हॉलीबॉल यांसारख्या सांघिक खेळांसह महिला व पुरुषांसाठी १०० मीटर धावणे, गोळाफेक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, जलतरण अशा वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषद अधिनस्त जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी तसेच शिक्षक वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्या शिर्के व मनोहर मडके यांनी प्रभावीपणे केले. क्रीडा महोत्सवामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह, एकजूट आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगान आणि सूर्य नमस्कार स्पर्धेत वसुंधरा अॅकॅडेमीची उत्तुंग भरारी



(समर्थ गांवकरी)

**अकोले (प्रतिनिधी)**

मातृमंदिर विश्वस्त संस्था, ज्ञानप्रबोधिनी पुणे आयोजित, राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगान आणि अन्य स्पर्धांमध्ये वसुंधरा अॅकॅडेमीच्या विद्यार्थ्यांनी समूहगान तसेच सूर्य नमस्कार व शिक्षकांनी अध्यापक समूहगान स्पर्धेत सहभाग घेतला. राज्यस्तरीय अध्यापक समूहगान स्पर्धेत वसुंधरा अॅकॅडेमीच्या शिक्षकांनी द्वितीय क्रमांक पटकावला. अध्यापक समूहगान स्पर्धेत वसुंधरा अॅकॅडेमीच्या उप प्राचार्य राधिका नवले, सहशिक्षिका प्राजक्ता सोलापुरे, सोनिया कोल्हे,वर्षा गोडे, त्रिवेणी घोडे, कल्पना मंडलिक, रोहिणी शिंदे, अण्णासाहेब केदार,पंकज धुमाळ यांनी सहभाग घेतला.विद्यार्थी समूहगान स्पर्धेत वसुंधरा अॅकॅडेमीच्या २५० विद्यार्थ्यांनी मिळून सूर, ताल, लयबद्ध देशभक्तीपर समूहगीत गायले. हे समूहगीत वसुंधरा अॅकॅडेमीचे संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांनी लिहिले व संगीतबद्ध केले. त्याचबरोबर सूर्यनमस्कार स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनीही उत्कृष्टरित्या सूर्यनमस्कार सादर करीत विभागीय पातळीवर द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धा आयोजकांच्या वतीने या स्पर्धेसाठी पुणे येथून आलेले मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे तज्ज्ञ परीक्षक श्री.नारायणजी देशपांडे, श्री. समाधानजी सुसर, ट्रस्टी, मातृमंदिर विश्वस्त संस्था, यांनी मातृमंदिर संस्थेच्या वतीने शाळेच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल आणि उपक्रमशील प्राचार्य म्हणून वसुंधरा अॅकॅडेमीच्या प्राचार्य डॉ.सौ.जयश्री देशमुख यांना सन्मानित केले. वसुंधरा अॅकॅडेमीच्या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ व योग शिक्षिका वर्षा गोडे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. सौ.जयश्री देशमुख, संस्थेचे सचिव विक्रम नवले, सहसचिव तथा प्राचार्य अल्फोन्सा.डी, उप प्राचार्य राधिका नवले,सर्व व्यवस्थापकीय मंडळ, सर्व विभागांचे प्राचार्य व विभाग प्रमुख आदींनी विशेष कौतुक आणि अभिनंदन केले.

# पारनेर मॅरेथॉन स्पर्धेत ढवळपुरी आश्रमशाळेचे घवघवीत यश

(समर्थ गांवकरी)

**पारनेर प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या मार्गदर्शनात पारनेर येथील नागेश्वर मित्र मंडळ आयोजित २५ व्या रौप्यमहोत्सवी पारनेर राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत ढवळपुरी येथील आश्रमशाळेच्या खेळाडूंनी २० बक्षिसांवर आपले नाव कोरीत या स्पर्धेत विक्रम केला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बक्षीसांचा पाऊस पाडीत आश्रमशाळेच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळविले. आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैलीदार खेळाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी पारनेरच्या नगराध्यक्षा डॉ विद्या कावरे, पारनेरचे पोलीस निरीक्षक संतोष खेडेकर, उद्योजक मारूतीशेठ रेपाळे, सुरेशशेठ पठारे आदींनी यावेळी आश्रमशाळेच्या खेळाडूंचे कौतुक करीत विशेष असे अभिनंदन केले.

### आश्रमशाळेचा अनोखा विक्रम

पारनेर राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये आश्रमशाळा ढवळपुरीचे या स्पर्धेतील सहभागाचे २० वे वर्ष होते. मागील वीस वर्षांपासून या स्पर्धेत आश्रमशाळेच्या खेळाडूंनी आपला दबदबा निर्माण केलेला आहे. हाच योगायोग पाहुन मार्गदर्शक शिक्षक लतिफ राजे यांनी विद्यार्थ्यांना २० व्या वर्षी २० बक्षीस मिळविण्याचे आवाहन केले होते. विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या स्पर्धेत २० बक्षीसांना गवसणी घालत एक अनोखा विक्रम केला. तसेच आपण दुर्गम भागातील असलो तरी स्पर्धेत मागे नाही हे दाखवून दिले.

**संदीप महांडुळे**
**मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, ढवळपुरी**





– १ ली ते ४ थी गट (मुली)
जया कोमा ठोंबरे – (पहिला क्रमांक)
छाया कोमा ठोंबरे – (तिसरा क्रमांक)
शितल म्हस्कु घुले – (चौथा क्रमांक) (मुले)
शिवम बाळू शिंगटे – (पहिला क्रमांक)
ओम भानुदास थोरात – (चौथा क्रमांक)
पवन रविंद्र जाधव – (सहावा क्रमांक)
शुभम गणेश बरकडे – (सातवा क्रमांक)
– ५ वी ते ७ वी गट (मुली)
माया पोपट शिंगटे – (दुसरा क्रमांक)
छाया मल्हारी टुले – (तिसरा क्रमांक)
अक्षदा पोपट करगळ – (सहावा क्रमांक)
जान्हवी एकनाथ भांड – (सातवा क्रमांक) (मुले)
महेश पोपट शिंगटे – (पहिला क्रमांक)
आदित्य बाबू केदार – (पाचवा क्रमांक)
हिरामण नाना केसकर – (सहावा क्रमांक)
–८ वी ते १० वी गट (मुली)
संगीता बाळू कोळपे – (तिसरा क्रमांक)
सोनाली मदन तांबे – (चौथा क्रमांक)
खुशी तुकाराम डोमाळे – (सहावा क्रमांक)
साक्षी संतोष लव्हाटे – (सातवा क्रमांक)
(मुले)
अभिषेक टकले – (तिसरा क्रमांक)
अजय थोरात – (सहावा क्रमांक)

विजयी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक लतीफ राजे, समाधान भुसारे, राधुजी चौधरी, बाबासाहेब फंड यांचे संस्थेचे अध्यक्ष शाहीद काझी, सचिव रेहान काझी, इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक विनोद लोंढे साहेब, ढवळपुरीच्या सरपंच सौ. नंदाताई भागाजी गावडे, उपसरपंच बबनराव पवार सर, सेवा सोसायटीचे चेअरमन भागाजी गावडे, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, माजी उपसरपंच संतोष चौधरी, चेअरमन सुखदेव चितळकर, मुख्याध्यापक संदीप महांडुळे, मुख्याध्यापक बापूसाहेब रुपनर तसेच शिक्षक, ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले.



# बरबडा वाडी येथील अशलील चाळे करणाऱ्या शिक्षका

## शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल

(समर्थ गांवकरी)

**नायगाव प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरबडावाडी येथे कार्यरत असलेल्या महिला शालेय पोषण आहार अळ्या आहेत म्हणून सर मि साप करून देतो असे म्हणत असतानाच तुला काम करायचे व

मनमानी करणारे

सेविकेच्या घटना घडल्याची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी संबंधित संजय मानकरी या शिक्षकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ७४, ७५( २), ११५( २) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी महिला (वय ३२ वर्षे, व्यवसाय – शालेय पोषण आहार सेविका, रा. बरबडा वाडी, ता. नायगाव, जि. नांदेड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास शाळेच्या स्वयंपाकगृहाजवळ संबंधित आरोपीने तिच्याशी गैरवर्तन करत शिवीगाळ व धक्काबुक्की केली. तसेच शरीराला अयोग्य स्पर्श करून केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे..

घटनेनंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनमध्ये धाव घेऊन तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शालेय परिसरातील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून दोषींविरुद्ध योग्य कायदेशीर कारवाई केली असून पुढील तपास पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# शिवपुरी गडावर रुद्रोपासना महोत्सव भक्ती सोहळ्याचे आयोजन

(समर्थ गांवकरी)

**तामसा प्रतिनिधी**

महाराष्ट्र मराठवाड्याच्या पावन भूमीतील एक आध्यात्मिक ऊर्जेचे केंद्र असलेल्या हदगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र शिवपुरी येथील 'समिधा' श्री. कोंडलिंगेश्वर गडावर महाशिवरात्रीच्या महामंगलयुक्ता पर्वावर 'रुद्रोपासना महोत्सव – २०२६' या देदिप्यमान भक्ती सोहळ्याचे आयोजन दि ९ फेब्रुवारी ते १६ फब्रुवारी दरम्यान केले असून या धार्मिक महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत परमपूज्य श्री. विरागीदास महाराज यांनी केले आहे. श्रीक्षेत्र शिवपुरी गडावरील प्राचीनकालीन समिधा श्री. कोंडलिंगेश्वर देवस्थानात महाशिवरात्रीच्या महामंगलयुक्त पर्वावर 'रुद्रोपासना महोत्सव – २०२६' या देदिप्यमान भक्तीमय धार्मिक सोहळा दि. ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केला आहे. महंत परमपूज्य श्री. विरागीदास महाराज यांच्या संकल्पनेतून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.





उपरोक्त कालावधीत संपन्न होणाऱ्या लोकोत्तर महोत्सवात आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांचा जागर होणार आहे. वैश्विक धर्मग्रंथ पारायण ऋचांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमला जाणार आहे. कार्यक्रमाच्या सात दिवस दररोज सायंकाळी भव्य दीपाराधनेत लक्षावधी दिव्यांच्या तेजाने शिवपुरीगड उजळणार आहे.

रात्री आठ ते दहा वेळात भक्तीचा मळा फुलवणारी सुश्राव्य नामसंकीर्तनात शि.भ.पं. शिव कथाकार गजानन महाराज कदम तामसेकर, शि.भ.पं. बाजीराव महाराज कळगावकर, शि.भ.पं. प्रणव स्वामी पडोळे भोकर, शि.भ.पं. पांडुरंग महाराज शास्त्री पांगरीकर, शि.भ.पं. महानुभाव प्रभाकर बाबा कपाटे, शि.भ.पं. रामजी महाराज ठाकरवाडीकर, शि.भ.पं. कृष्णा महाराज बोंबीलवार कारला तर काल्याचे किर्तन कार शि.भ.पं. सोमीनाथ महाराज नरोडे जालना आदी प्रख्यात कीर्तनकारांचा समावेश आहे. काकडा, नित्यारती, शिवलीलामृत, परमाब्धि पारायण, रुद्रपाठ, षडाक्षरीमंत्र, वैश्विक मंत्रजप व हरिपाठ, भजन, कीर्तन महाप्रसाद राहील. रुद्रपाठ पौरोहीत्य पं. विवेक गुरुजी मध्यप्रदेश यांचे राहील. श्रद्धेची पावले आणि शिव उपासनेची ओळख ओढ निर्माण करणारी भव्य कावड यात्रा व 'शिवसेवेतून जीवसेवा' या उदात्त हेतूने राबवला जाणारा रक्तदान हा सामाजिक यज्ञ. महाशिवरात्री पर्वावर परमाब्धीप्रसार महोत्सव, किर्तन महोत्सव, दीपाराधना महोत्सव असा भक्तिमय संगम अर्थात रुद्रोपासना महोत्सव एक ऐतिहासिक भक्तीमय, आध्यात्मिक क्रांतीचा हुंकार ठरावा. हा 'शिवजागर' जनमानसाच्या हृदयात साठावा. यासाठी भाविकांनी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन समिधा श्री कोंडलिंगेश्वर देवस्थानचे महंत परमपूज्य विरागीदास महाराज यांनी केले आहे.

# बिलोलीत अवैध जुगार अड्डयावर धाड, सात जुगारीसह १७ लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त

## एका आठवड्यात जुगार अड्डयावर पोलिसाची दुसरी कारवाई

(समर्थ गांवकरी)

**नांदेड /प्रतिनिधी**

नांदेड जिल्हा बिलोली शहरातील लोहार गल्ली येथे जुगार खेळत असल्याची वरिष्ट अधिकारी यांना गोपनीय माहीती मिळाल्यानुसार दि. ६ फेब्रुवारी रोजी रात्री १० :३० वाजल्याच्या सुमारास बिलोली पोस्टे सपोनि के.व्ही.शिंदे व यांच्या पाथकांनी धाड टाकून कार्यवाही केली असता, त्या ठिकाणी सात जुगारी अंदर बाहर नावाचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले.या कार्यवाहीत सात जुगारीसह १७ लाख २५ हजाराचा मुद्देमाल पोलीस प्रशासनानी जप्त केला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,

यांनी अवैध धंदे करणाऱ्यावर कार्यवाही करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते.आणि याआधी बिलोली शहारालगत सावळी रोड येथे आयजीच्या विशेष पाथकांनी धाड टाकून मोठी कारवाई केली होती. ही कारवाई होऊन आठदिवसही लोटले नाहीत तरी पुन्हा शहरातील लोहार गल्ली येथे काही जुगारी अंदर बाहर नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहीती मिळाल्याने वरिष्टांच्या आदेशावरुन सदर ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी शाम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि के. व्ही. शिंदे व पोहेकॉ मुद्देमवार, मिरदोडे पोकों/कठारे, धुपटवाड, वनशेट्टे, अंमलदार यांनी सदर ठिकाणी धाड टाकून कार्यवाही केली असता या ठिकाणी आठ जुगारी जुगार खेळत असल्याचे आढळून आले. यात ईलियास पाशा शेख,(३०) रा.मदिना कॉलनी मंडल निझामाबाद, सुदाम पोशेट्टी मिरले(४०) रा. रेंजल जि. निझामाबाद, मोहमद युणुस मोहमद रसुल( ५५ ) रा.मुकारामपूरा निझामाबाद, मोहमद इब्राहिम खान( ५८) रा. ऑटोनगर मदरसा, धनगरी मुथी रामलु( ५७ ) रा. बरदीपूर ता. बोधन, खैरान सोहेल नवाबसाब(५२) रा. शेखर नगर बोधन, राकेश गंगाराम गोगरोड (२६) रा.धोबी गल्ली बिलोली, शेख साजिद उर्फ सजुलाल अहेमद रा. लोहार गल्ली बिलोली (फरार)अशा आठ जुगारा पैकी सात जुगारांना पोलीस प्रशासनांनी ताब्यात घेतले असून, अन्य एक फरार झाला आहे. यासह घटनास्थळावर एमएच ४५ एन ७५८१ हुडांई कार ज्याची किंमत १३ लाख ५० हजार व इंडिका व्हिस्टा कार टिजी १६ सी- ८०७८ किंमत ३ लाख ५० हजार आहे. आणि नगदी रक्कम २५०५० रुपये असे जुगाराच्या साहित्यसह एकुण १७ लाख २५०५० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन पोकॉ निरंजन अंबुरे यांच्या फिर्यादानुसार सदर जुगारा विरोधात मजुका अधिनियमा अंतर्गत बिलोली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घडवले लोकधारेचे दर्शन!

(समर्थ गांवकरी)

**शिर्डी/प्रतिनिधी**

### शिर्डीत जलसंपदा विभागाचा सांस्कृतिक सोहळा उत्साहात

एरवी धरणाचे पाणी व प्रशासकीय कामांच्या व्यापात व्यस्त असणाऱ्या जलसंपदा विभागाच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांनी शिर्डीत एक वेगळीच मैफल सजवली. राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांनी व महाराष्ट्राच्या लोकधारेच्या दर्शनाने उपस्थितांची मने जिंकली.

साईबाबा संस्थानच्या शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात गेल्या दोन दिवसांपासून या स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू आहेत. स्पर्धेत सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी केवळ आपल्या कामातच नव्हे, तर कलेतही आपण निपुण असल्याचे सिद्ध केले. काहींनी शास्त्रीय संगीताचा गंभीर सूर लावला, तर काहींनी जुन्या-नव्या हिंदी-मराठी गाण्यांची बहारदार मेजवानी दिली. विशेष म्हणजे, या मंचावर महाराष्ट्राच्या अस्सल लोकधारेचा जागर पाहायला मिळाला. 'कडक लक्ष्मी' व महाराष्ट्राची परंपरा असलेल्या 'गोंधळी' नृत्याने उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला.

पहिल्या दिवशी सादर झालेल्या विविध नाट्य कलाकृतींमधूनही महाराष्ट्राचा समृद्ध वारसा दिसून आला.जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावून प्रशासकीय अधिकाऱ्यांमधील या सुप्त गुणांना मनापासून दाद दिली.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण ठरले ते 'राम जी की निकली सवारी' हे नृत्य ! या सादरीकरणाने संपूर्ण सभागृहाचे वातावरण भक्तीमय व राममय करून सोडले. तसेच इतर राज्यांतील संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या नृत्यांनीही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रशासकीय सेवेतील शिस्त सांभाळतानाच आपल्यातील कलाकाराला जिवंत ठेवणाऱ्या या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. या दिमाखदार स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.





कु. तेजल संतोष गोसावी यांची मुंबई कारागृह पोलीस या ठिकाणी निवड झाल्याबद्दल अडसरे खुर्द येथे गावामधून मिरवणूक काढून गोसावी समाज व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तेजल संतोष गोसावी (मुंबई कारागृह पोलीस) यांना (भारताचे राष्ट्रपती) द्रौपदी मुर्मू यांची फोटोची प्रतिमा भेट देऊन व शाल पुष्प गुच्छ देऊन श्री. दत्तात्रय गोसावी (सामाजिक कार्यकर्ते बारागाव पिंपरी) यांनी सत्कार केला. याप्रसंगी नामदेव गोसावी सागर गोसावी विशाल ढेंगळे सुलोचना गोसावी माधुरी गोसावी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. षीं.८.२.२६ संपादित केले

# नायगावचा विकास गहाण!

## कमी दरांना ठोकर, जास्त खर्चाला मोकळीक – जिल्हा परिषदेत ‘निविदा–माफिया’ सक्रिय?

(समर्थ गांवकरी)
**नायगाव प्रतिनिधी**

नायगाव विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आज प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नव्हे, तर जाणीवपूर्वक राबवण्यात येणाऱ्या निविदा–रद्दीच्या खेळामुळे अडवली जात असल्याचे उघड वास्तव समोर येत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, शाळा दुरुस्ती, नाली–गटार यांसारख्या मूलभूत गरजांची कामे कमी दरात होऊ शकत असतानाही ती पद्धतशीरपणे रद्द केली जात आहेत. हा योगायोग नसून नियोजनबद्ध आर्थिक खेळी असल्याचा आरोप आता उघड होत आहे.

नायगाव मतदारसंघातील अनेक गावांमध्ये निधी मंजूर, आराखडे तयार, निविदा सादर – सर्व प्रक्रिया पूर्ण असूनही शेवटच्या टप्प्यावर कामे रद्द केली जात आहेत. कारण एकच सांगितले जाते, ते म्हणजे तांत्रिक कारण आहे. मात्र ही तथाकथित कारणे कधीही लेखी, सार्वजनिक किंवा पारदर्शक पद्धतीने मांडली जात नाहीत. मग प्रश्न असा उरतो– कमी दरच प्रशासनाला नको आहे का?

**‘कमी खर्च’ प्रशासनाला धोकादायक का वाटतो?**

जर कमी दराच्या निविदा मंजूर झाल्या, तर शासनाचा पैसा वाचतो.

पण जर पैसा वाचतो, तर कोणाचे नुकसान होते?

याच प्रश्नामुळे जिल्हा परिषद प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

निविदा रद्द करण्याचे अधिकार थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे असूनही सीईओ व विभागप्रमुखांचे मौन म्हणजे या साऱ्या प्रक्रियेला दिलेले मूक समर्थनच मानले जात आहे. नायगावकरांच्या विकासाची किंमत जर जास्त दर, विलंब आणि निकृष्ट कामाच्या रूपाने वसूल केली जात असेल, तर ही केवळ प्रशासनाची चूक नाही– ही जनतेशी केलेली उघड फसवणूक आहे.

**यामुळेच नायगाव मतदारसंघ पेटतोय**

कमी दर चालत नसतील तर निविदा काढायच्याच कशाला?

हा सरळ सरळ जनतेच्या पैशांचा खेळ आहे.

प्रशासन मुद्दाम कामे रखडवत आहे, हे आता उघड आहे.

नायगाव म्हणजे प्रयोगशाळा नाही; इथे लोक राहतात.

संतप्त नागरिक सामाजिक कार्यकर्ते व राजकीय मंडळीच्या प्रतिक्रिया

**नायगावकरांचा आमदार मोहदयांना सवाल**

नायगाव मतदारसंघातील विकासकामे उघडपणे रखडत असताना आमदार महोदय नेमके कुठे आहेत?

जिल्हा परिषद प्रशासनाकडून होत असलेल्या या निविदा–रद्दीवर त्यांनी एकदाही जाहीर भूमिका मांडली आहे का?

की प्रशासनाच्या निर्णयांवर प्रश्न विचारणे त्यांना राजकीय गैरसोयीचे वाटत आहे का?

नायगावकरांचा पैसा जाळला जात असताना आमदारांचे मौन म्हणजे नेमके काय समजायचे?

मतदारसंघाचा विकास रोखला जात असताना लोकप्रतिनिधींनी गप्प बसणे हीच सर्वात मोठी शोकांतिका समजली जात आहे.

**आता प्रश्न नाही, थेट मागणी!**

नायगाव मतदारसंघातील सर्व रद्द निविदांची यादी तात्काळ जाहीर करावी

त्या निर्णयांची स्वतंत्र दक्षता व आर्थिक चौकशी व्हावी

दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंग नव्हे, फौजदारी कारवाई करावी

नायगावचा विकास हा कमिशन, सेटिंग आणि प्रशासकीय खेळाचा बळी ठरू दिला जाणार नाही, असा इशारा आता जनतेतून दिला जात आहे.

आज नाही तर उद्या, पण हा प्रश्न रस्त्यावर येणारच–

आणि तेव्हा जबाबदारी कुणाची, हे नायगावकर कदापी विसरणार नाहीत एवढे नक्की.

## लोणी ते खोपोली पायी दिंडी सोहळ्याचे मंचर येथे मंगळवारी स्वागत

(समर्थ गांवकरी)
**मंचर प्रतिनिधी**

सिद्धतपस्वी प.पु.स्वामी गगनगिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व प.पु.आशिष महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र लोणी ते श्रीक्षेत्र खोपोली (सिद्धाश्रम) असा पायी दिंडी सोहळ्याचे मंचर येथे मंगळवार दि.१० रोजी स्वागत करण्यात येणार आहे. अशी माहिती भाविक भक्त अनिल थोरात यांनी दिली.

शुक्रवार दि.६ पासून सुरू झालेला हा दिंडी सोहळा सोमवार दि.१६ रोजी खोपोली येथे समारोप होणार आहे. श्रीक्षेत्र लोणी प्रवरा येथील श्री लोमेश्वर मंदिरातून दिंडी प्रस्थान करून खोपोली येथील पाताळगंगा सिद्धाश्रम येथे समारोप होणार आहे.या दिंडी सोहळ्याच्या मंगळवार दि.१० रोजी दुपारच्या अन्नदानासाठी मंचर येथील अनिल भिकाजी थोरात यांच्याकडून अन्नदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.पंचक्रोशीतून भाविक व वारकरी या पायी दिंडीत सहभागी होत असून भक्तीमय वातावरणात सोहळा पार पडणार असल्याचे सांगण्यात आले.

## बस आणि दुचाकीची भीषण धडक, मोरझीरा येथील युवकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू

(समर्थ गांवकरी)
**डांग/प्रतिनिधी**

निसर्गसौंदर्याने नटलेल्या डांग जिल्ह्यात मुख्य मार्गांवर अपघातांची मालिका सुरूच असून शनिवारी रात्री आहवा–वघई राज्य महामार्गावर नडगखाडी गावाजवळ एक भीषण रस्ता अपघात झाला. या अपघातात एसटी बस आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन दुचाकीस्वाराचा जागीच करुण अंत झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आहवा डेपोची आहवा–अहमदाबाद मार्गावरील एसटी बस (क्रमांक : ग्रा १८ नढ २४५४) प्रवाशांना घेऊन आपल्या नियमित मार्गावरून जात होती. त्याच वेळी वघईकडून आहवाकडे येणारी दुचाकी (क्रमांक : ग्रा १९ ङ ५६०३) नडगखाडी गावाजवळील धोकादायक वळणावर आली.

दुचाकीस्वाराने वळणावर आपली बाजू सोडून चुकीच्या दिशेने (रॉंग साइड) वाहन चालवले होते. वळण असल्याने समोरून येणाऱ्या एसटी बसच्या चालकाला वाहन थांबवण्याची किंवा चुकवण्याची संधी मिळाली नाही आणि दुचाकी थेट बसच्या पुढील भागावर जोरात आदळली.

अपघात इतका भीषण होता की दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला. या अपघातात दुचाकीस्वार रामचंद्रभाई नवसुभाई बागुल (वय ४१), रा. मोरझीरा, ता. आहवा, यांना डोक्यासह शरीराच्या इतर भागांवर गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थ व रस्त्यावरील प्रवासी मदतीसाठी धावून आले. अपघातामुळे काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच वघई पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला असून पोस्टमार्टेमसाठी आहवा सिव्हिल रुग्णालयात पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, एसटी बस व दुचाकी बाजूला काढून पुढील कायदेशीर तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## मंचर येथील श्री तपनेश्वर महाशिवरात्री महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

(समर्थ गांवकरी)
**मंचर प्रतिनिधी**

श्री तपनेश्वर मंदिर, भिमाशंकर रोड, मंचर (ता. आंबेगाव) येथे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सोमवार दि. ९ ते सोमवार दि. १६ या कालावधीत सप्ताहाचे नियोजन करण्यात आले

सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७.३० ते ९ शिवलीलामृत ग्रंथ पारायण (विठ्ठल मंदिर ज्ञानेश्वरी पारायण मंडळ, मंचर), सकाळी १० ते १२ गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व हरिकिर्तन, सायंकाळी ७ ते ९ किर्तन आणि रात्री ९ ते ११ अन्नप्रसाद असा कार्यक्रम होणार आहे. सप्ताह काळात हर्षद महाराज पारखे, रोहित महाराज शेवाळे सिद्धेश महाराज वाबळे, ओमकार महाराज भोर,तन्वीताई महाराज विश्वासराव, अविष्कार महाराज पोखरकर, प्रशांत महाराज पाबळे यांची कीर्तने होणार आहे.सोमवार दि.१६ रोजी मयूर महाराज बोडके यांचे काल्याचे किर्तन त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.या सप्ताहासाठी मंचर वारकरी संप्रदाय मंडळ, चिंचपुरेमळा, बाणखेलेमळा (पांढरीचामळा), मोरडेवाडी, निघोटवाडी, शेवाळवाडी, मंचर नगरपंचायत तसेच विविध गावांतील वारकरी मंडळांचे सहकार्य लाभले आहे.

## जंगलांवर बांबू कटिंगचा घात – वन्यजीव मानवी वसाहतींकडे ढकलले

(समर्थ गांवकरी)
**डांग/प्रतिनिधी**

डांग जिल्ह्याची ओळख असलेली दाट व हिरवीगार जंगले आज गंभीर संकटास सामोरी जात आहेत. या निसर्गसंपन्न जंगलांवर खुलेआम कुऱ्हाड चालवली जात असून कोवळ्या व हिरव्या बांबूंच्या बेफाम कापणीमुळे डांगची हिरवट जंगल संपन्नता झपाट्याने नष्ट होत आहे. यामुळे घनदाट जंगले हळूहळू ओसाड होत चालली असून त्याचा थेट फटका वन्यजीवनाला बसत आहे.



वन विभागाने बांबूला गवत कुलातील वनस्पती घोषित केल्यानंतर त्याच्या कापणीसाठी मोठ्या प्रमाणावर मोकळीक देण्यात आल्याचे गंभीर आरोप होत आहेत. दिवस–रात्र सुरू असलेल्या कोवळ्या बांबूंच्या कापणीमुळे अनेक भागांतील दाट झुडपे नष्ट झाली आहेत. बांबूंची दाटी ही बिबटे, हरिण, ससे, रानडुक्कर आदी अनेक वन्यप्रजातींसाठी सुरक्षित कवच व नैसर्गिक निवासस्थान आहे; मात्र हे कवच हळूहळू नष्ट होत असल्याने मानवी व वन्यजीवांमधील संघर्षात चिंताजनक वाढ होत आहे.

अलीकडच्या काळात ग्रामीण भागात वन्यप्राण्यांचे वारंवार दर्शन, मानवांवर हल्ले, शेतीच्या पिकांचे नुकसान तसेच पाळीव जनावरांवर हल्लयांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे स्थानिकांनी सांगितले. पर्यावरणप्रेमींचा गंभीर आरोप आहे की कोणताही वैज्ञानिक अभ्यास किंवा पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन न करता बांबू कटिंगसाठी परवानग्या दिल्या जात आहेत.

डांगसारख्या आदिवासी व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील जिल्ह्यात जंगले म्हणजे केवळ झाडे नसून संपूर्ण परिसंस्थेचा कणा आहेत. बांबू मातीचे धूप रोखतात, पावसाच्या पाण्याचा साठा वाढवतात तसेच वन्यजीवांसाठी अन्न व निवास उपलब्ध करून देतात. अशा परिस्थितीत कोवळ्या बांबूंची बेफाम कापणी ही डांगच्या पर्यावरणासाठी दीर्घकालीन व अपूरणीय नुकसान ठरू शकते.

या पार्श्वभूमीवर डांग जिल्ह्यातील निसर्गप्रेमी व स्थानिक नेत्यांनी तात्काळ बांबू कटिंगची कामे स्थगित करण्याची, स्वतंत्र पर्यावरणतज्ज्ञांची समिती नेमून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.

आता प्रश्न असा आहे की वन विभाग वेळेत कठोर पावले उचलून डांगची जंगले वाचवणार का, की हिरवळीने नटलेला डांग हळूहळू ओसाड जंगलात रूपांतरित होणार? डांगचे पर्यावरण जतन करणे ही केवळ एका जिल्ह्याची नव्हे, तर संपूर्ण राज्याची सामूहिक जबाबदारी आहे. डांग जिल्ह्यात सुरू असलेले कोवळ्या बांबूंचे अनियंत्रित नष्टीकरण थांबणार की पर्यावरण विनाशाच्या दिशेने वाटचाल होणार, हे येणारा काळच ठरवेल.

## पारनेर मध्ये त्याग मूर्तीमाता रमाई यांची १२८वी जयंती उत्सव साजरी

(समर्थ गांवकरी)
**पारनेर प्रतिनिधी**

पारनेर मध्ये भारतीय बौद्ध महासभा व राहुल नगर महिला मंडळ राहुल नगर मित्र मंडळ यांच्या वतीने माता रमाई यांचे तालुकास्तरीय १२८ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

त्यागमूर्ती माता रमाई यांचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील जे योगदान आहे नऊ कोटी लेकरांसाठी माता रमाईनेआपले संपूर्ण आयुष्य कष्टात घालवले आपल्यासाठी आपली पोटची लेकरं गमावली त्या मायेचे आपल्यावर किती उपकार आहेत त्याची जाणीव ठेवून पारनेर मधील सर्वच महिला भगिनींनी गेल्या वर्षीपासून माता रमाई यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करायचे ठरवलेला आहे त्याप्रमाणे याही वर्षी खूप मोठ्या उत्साहात माता रमाई यांचे १२८ सर्व जयंती साजरी करण्यात आली.विचार मंचावर पारनेर नगरपंचायत च्या नगराध्यक्ष विद्या कावरे मॅडम भारतीय बौद्ध महासभेच्या अहिल्यानगर जिल्हा महिला उपाध्यक्ष प्रीतीताई जाधव भारतीय बौद्ध महासभेच्या अहिल्यानगर दक्षिणच्या सचिव शुभांगीताई पवार ,भारतीय बौद्ध महासभेच्या कायदेशीर सल्लागार एडवोकेट सुनिता ताई शिंदे भारतीय बौद्ध महासभेच्या सचिव एडवोकेट मोनिका सोनवणे सरचिटणीस सुनंदा साळवे संघटक सुनिता पाडळे, अँड मयुरी जाधव, बेबीताई जगताप,पर्यटक सचिव स्मिता नगरे संघटक दिपाली गायकवाड,कल्पना सोनवणे पारनेर नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी नगरसेवक पद्माकर भालेकर सिद्धार्थ साळवे आर पी आय महिला तालुकाध्यक्ष आरती सोनवणे, मृणाली सूर्यवंशी,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या पारनेर तालुका महिला अध्यक्ष सुनीताताई नगरे



ह्या होत्या कार्यक्रमाची प्रस्तावना एडवोकेट मोनिका सोनवणे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एडवोकेट सुनीता शिंदे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे अहिल्यानगर दक्षिणचे जिल्हा पर्यटक वीरेंद्र पवार सर,पारनेरचे तालुका अध्यक्ष संपत पवार सर,आर पी आय चे तालुकाध्यक्ष किरण सोनवणे युवा उद्योजक सचिन नगरे बाजार कमिटीचे संचालक शंकरराव नगरे नवनिर्वाचित नगरसेवक अमित भाऊ जाधव सैनिक बँकेचे संचालक मधुकर साळवे सरपंच बाळासाहेब नगरे जामगावचे सरपंच सुनील शिंदे रमेश गायकवाड गोरख सूर्यवंशी आदींनी कार्यक्रम मेसेज करण्यासाठी परिश्रम घेतले

## महाशिवरात्रीच्या पर्वावर श्री अगस्ती देवस्थान येथे अखंड हरिनाम सप्ताह व तीन दिवसीय भव्य यात्रोत्सवाचे आयोजन!

(समर्थ गांवकरी)
**अकोले: प्रतिनिधी**

आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान श्री अगस्ती देवस्थान या ठिकाणी महाशिवरात्रीच्या पर्वकाळावर प्रतिवर्षाप्रमाणे अखंड हरिनाम उत्सव व महाशिवरात्र यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री महर्षी अगस्ती महाराज हे अखिल जगाचे श्रद्धास्थान आहे व अकोले तालुक्याचे आराध्य दैवत आहे या ठिकाणी अनेक धार्मिक उत्सव होत असतात. त्यामध्ये महाशिवरात्रीचा सप्ताह व यात्रोत्सव विशेष असतो. याही वर्षी भव्य दिव्य प्रवचन कीर्तन महोत्सवाचे आयोजन तसेच महाशिवरात्र व सोमवती अमावस्येच्या पर्वकाळावर तीन दिवसीय १५,१६व १७ तारखेला भव्य यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे .अशी माहिती अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष ॲड के डी धुमाळ यांनी दिली.

यावर्षीच्या सप्ताहाची सुरुवात सोमवार दि ९ फेब्रुवारी सकाळी आठ वाजता घटस्थापना व ध्वजारोहण सोहळ्याने होणार आहे.

या उत्सवात महाराष्ट्रातील दिग्गजांची प्रवचन व किर्तने होणार आहे. सर्वश्री ह भ प देवराम महाराज वाकचौरे कळस, संदीप महाराज सावंतवाडी ,सोमनाथ महाराज भोर धामणगाव, राजेंद्र महाराज ढोन्नर समशेरपुर ,नितीन महाराज देशमुख सुगाव, सुरेश महाराज भालेकर खानापूर यांची प्रवचने होणार आहेत तसेच जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक ज्ञानेश्वर महाराज कदम मोठे माऊली, विश्वनाथजी महाराज वारिंगे भिवंडी, श्रावणजी महाराज अहिरे मालेगाव ,आचार्य प्रसादजी महाराज भोर संगमनेर , अर्जुनजी महाराज मोटे परभणी, श्रीरामजी महाराज बोचरे नेवासा, मनोहर महाराज भोर अंबड व ह भ प संतदासजी महाराज मनसुख जुन्नर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. सप्ताह काळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे महाशिवरात्रीच्या पर्वावर रविवारी पहाटे ३ वाजता सौ. स्मितताई व शंकर जी गायकर साहेब केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय प्रवक्ते विश्व हिंदू परिषद तसेच तालुक्याचे आमदार सौ पुष्पाताई व डॉक्टर किरणजी लहामटे साहेब यांचे हस्ते महा अभिषेक होऊन पहाटे ४ वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे यात्रोत्सवासाठी ६एकरच्या मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आलेली आहे. अधिकाधिक व्यापारी बांधवांनी या यात्रेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. यात्रेचे आकर्षण आसलेले रहाट पाळणे यांची उभारणी करण्याचे काम सुरू झाले आहे. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई व भव्य




मंडप उभा करण्यात आलेला आहे .अशी माहिती देवस्थानच्या अध्यक्ष व विश्वस्त मंडळांनी दिली

या कामी विश्वस्त गुलाबराव शेवाळे,परबतराव नाईकवाडी,किसनशेठ लहामगे,दिपक महाराज देशमुख, राजेंद्र महाराज नवले,गणेश महाराज वाकचौरे,भानुदास तिकांडे,मधुकर वाकचौरे,रमेश नवले,मच्छिंद्र भरीतकर, दिलीप कोटकर, संतोष तिकांडे,रामचंद्र वावळे,रामचंद्र हासे,बाळासाहेब घोडके,महेश सारडा,जयप्रकाश महाले व देवस्थान चे व्यवस्थापक रामनाथ मुतडक हे परिश्रम घेत आहेत.

## थोडक्यात....

### आंबेगावमध्ये क्रॉस व्होटिंगची चर्चा; काही उमेदवारांचे गणित बिघडण्याची शक्यता

**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील पाच जिल्हा परिषद गट आणि दहा पंचायत समिती गणांमध्ये मतदान पार पडल्यानंतर आता क्रॉस व्होटिंगची चर्चा रंगू लागली आहे.त्यामुळे काही उमेदवारांचे विजयी गणित बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.मतदानाच्या दिवशी काही ठिकाणी पक्षनिष्ठेपेक्षा वैयक्तिक समीकरणांना प्राधान्य देत मतदारांनी वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांना मते दिल्याची चर्चा मतदारसंघात जोर धरत आहे.सामान्यतः एका पक्षाचा जिल्हा परिषद उमेदवार आणि त्याच पक्षाचा पंचायत समिती उमेदवार यांनाच मतदान होणे अपेक्षित असताना काही ठिकाणी भिन्न पक्षातील उमेदवारांना मतदान झाल्याचे बोलले जात आहे.विशेषतः काही मतदान केंद्रांवर पक्षातील जिल्हा परिषद उमेदवाराला मत देऊन पंचायत समितीसाठी दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराला मतदान केल्याच्या चर्चा कार्यकर्त्यांतून ऐकू येत आहेत.यामुळे काही ठिकाणी उमेदवारांच्या गणितात बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.क्रॉस व्होटिंगमुळे अपेक्षित मतांची विभागणी होऊन काही उमेदवारांना अनपेक्षित फटका बसू शकतो, अशीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे.अधिकृतरीत्या याबाबत कोणतीही पुष्टी नसली तरी मतमोजणीच्या निकालानंतरच क्रॉस व्होटिंगचा खरा परिणाम स्पष्ट होणार आहे.त्यामुळे सर्वच पक्षांचे उमेदवार आणि कार्यकर्ते आता निकालाकडे लक्ष लावून आहेत.

### मतमोजणीपूर्वी उमेदवारांचे ताणतणाव वाढले; चर्चांनी राजकीय वातावरण तापले

**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर आता मतमोजणीपूर्वी राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.मतदानानंतर विविध गावांमध्ये आणि मळ्यांमध्ये अपेक्षित मतदान झाले नाही, काही कार्यकर्ते विरोधात गेले, तर काही ठिकाणी प्रतिस्पर्धी उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात पैसे वाटप झाल्याच्या चर्चांनी उमेदवारांचे ताणतणाव वाढले आहेत.या चर्चांचा परिणाम निकालावर होणार का, याबाबत सर्वत्र उत्सुकता निर्माण झाली आहे.

काही उमेदवारांच्या समर्थकांकडून आपल्या बाजूने मतदान कमी झाले, काही कार्यकर्त्यांनी साथ सोडली, समोरच्या गटाने जोरदार हालचाली केल्या अशा चर्चा ऐकू येत असून, त्यामुळे निकालाबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी नसली तरी या चर्चांनी राजकीय वर्तुळात चांगलाच रंग भरला आहे.सोमवार दि.९ रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. कोण विजयी ठरणार आणि कोणाला पराभव स्वीकारावा लागणार, याबाबत उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.मतमोजणीच्या दिवशीच या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळणार असल्याने तालुक्यातील राजकीय वातावरणात सध्या प्रतीक्षेचा ताण स्पष्टपणे जाणवत आहे.

### पैंसे वाटपात गफलतीच्या चर्चांनी तालुक्यात खळबळ; काही उमेदवारांची चिंता वाढली.

**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुक मतदानानंतर आता मतदारसंघात पैशांच्या वाटपाबाबत गफलतीच्या चर्चांना उधाण आले आहे.काही ठिकाणी उमेदवारांनी मतदारांना देण्यासाठी पदाधिकाऱ्यांकडे निधी सोपवला; मात्र प्रत्यक्षात मतदारांच्या हातावर अपेक्षेपेक्षा कमी रक्कम ठेवण्यात आल्याची चर्चा रंगू लागली आहे.

एका हजार रुपयांप्रमाणे रक्कम देण्यात आल्याचे सांगितले जात असताना काही समर्थकांनी मध्येच हात मारत केवळ ५०० ते ७०० रुपयेच मतदारांपर्यंत पोहोचवल्याची चर्चा कार्यकर्ते व मतदारांत सुरू आहे.तालुक्यातील पाचही जिल्हा परिषद गटांपैकी एका गटात तर काही लाभार्थ्यांपर्यंत शंभर टक्के रक्कम पोहोचली नसल्याची चर्चा अधिक जोर धरत आहे. या कथित गोंधळामुळे संबंधित उमेदवारांचे निवडणूक गणित बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी नसली तरी या चर्चांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.मतमोजणी जवळ आल्याने अशा चर्चांचा परिणाम निकालावर होईल का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. नेमका परिणाम काय होतो, हे मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार असल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांमध्ये सध्या अनिश्चिततेचे वातावरण दिसून येत आहे.

### मतदानानंतर उमेदवारांची नजर मतमोजणीकडे; पंधरा दिवसांच्या धावपळीला विश्रांती

**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत गेल्या पंधरा दिवसांपासून उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची प्रचंड धावपळ सुरू होती. प्रचार सभा, पदयात्रा, घरोघरी भेटी, गावभेटी आणि कार्यकर्त्यांच्या बैठका अशा विविध माध्यमांतून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात कष्ट घेतले. ग्रामीण भागातील दुर्गम वाड्या–वस्त्यांपर्यंत जाऊन मतदारांशी संपर्क साधण्यासाठी दिवसरात्र मेहनत घ्यावी लागली.

मतदानाचा दिवस पार पडल्यानंतर आता या सर्व धावपळीला थोडी विश्रांती मिळाली असून उमेदवार व समर्थकांचे लक्ष सोमवार, दि,९ रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. गेल्या काही दिवसांत घेतलेल्या परिश्रमांचे फलित काय लागणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे. काही ठिकाणी विजयी होण्याचा आत्मविश्वास दिसत असला तरी निकालाबाबत अनिश्चिततेचे वातावरणही जाणवत आहे.मतमोजणीच्या दिवशीच कोणाचा विजय होणार आणि कोणाला पराभव स्वीकारावा लागणार, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता असून तालुक्यात सध्या प्रतीक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वांचे लक्ष आता मतमोजणीच्या निकालाकडे लागले आहे.

### मतमोजणीपूर्वीच विजय मिरवणुकीची तयारी; उमेदवारांचे नियोजन पूर्ण.

**मंचर प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतमोजणीपूर्वीच काही उमेदवारांकडून संभाव्य विजय उत्सवासाठी जोरदार तयारी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.निवडणूक निकाल लागल्यानंतर विजयी उमेदवारांची मिरवणूक काढण्यासाठी अनेकांनी विजयी रथ सज्ज ठेवले असून झांज पथके, फटाके, गुलाल, भंडारा आणि फेट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. काही ठिकाणी समर्थकांसाठी जेवणाचीही नियोजनबद्ध तयारी केल्याचे बोलले जात आहे.मतमोजणी संपल्यानंतर अधिकृत घोषणा होताच विजयी उमेदवारांचे स्वागत आणि मिरवणुका काढण्यासाठी कार्यकर्ते सज्ज असल्याचे दिसून येत आहे.गावागावांतून समर्थकांना एकत्र आणून उत्सवाचे नियोजन करण्यात आले असून वातावरणात उत्सुकता वाढली आहे.मात्र, प्रशासनाच्या नियमांचे पालन करूनच मिरवणुका काढाव्यात, असे आवाहनही करण्यात येत आहे. सध्या सर्वांचे लक्ष सोमवार दि. ९ रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले असून कोणत्या उमेदवाराचा विजय होणार आणि कोणाची मिरवणूक निघणार, याबाबत मोठी उत्सुकता आहे. निकाल जाहीर होताच तालुक्यातील राजकीय वातावरण आणखी रंगणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

# पारनेरमध्ये प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात महाशिवरात्र उत्सव उत्साहात साजरा

(समर्थ गांवकरी)
पारनेर/ प्रतिनिधी

शहरातील कोर्टगल्ली येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्र पारनेर येथे महाशिवरात्र उत्सव अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

परमपिता शिव परमात्मा यांच्या दिव्य अवतरणाचे स्मरण करत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचा प्रारंभ विद्यालयाच्या संचालिका साधना दिदी यांच्या हस्ते सकाळची ईश्वरीय 'मुरली' कथन करून झाला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या सोहळ्यासाठी पारनेर पब्लिक स्कूलचे प्राचार्य गिताराम म्हस्के (सर), प्रसिद्ध उद्योजक संभाजी मगर, देवराम थोरे,ड. जाधव भाऊसाहेब, थोरे साहेब, पवार सर, खोडदे भाई,राम भाई यांसह परिसरातील अनेक मान्यवर आणि शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिव अवतरणाचे ९० वे वर्ष

उपस्थितांना मार्गदर्शन करताना साधना दिदी यांनी महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या की, श्रीमद्भगवद्गीतेच्या वचनानुसार, जेव्हा जेव्हा मनुष्य धर्मभ्रष्ट आणि कर्मभ्रष्ट होतो, समाजात नैतिकतेचा ऱ्हास होतो, अशा वेळी स्वयं निराकार परमपिता शिव या भारत भूमीवर अवतरीत होतात. शिव परमात्म्याने या सृष्टीवर अवतरीत होऊन आता ९० वर्षे पूर्ण होत आहेत. हे वर्ष 'हीरक महोत्सवी' आनंद घेऊन आले असून, मानवाच्या कल्याणासाठी हा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे.

अध्यात्मिक रहस्यांचे उलगडा

साधना दिदी यांनी पुढे नमूद केले की, महाशिवरात्र म्हणजे केवळ उपवास किंवा जागरणाची रात्र नसून, ती अज्ञानाच्या अंधकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे जाण्याची रात्र आहे. जीवनातील विकारांचा त्याग करून आत्मिक शांतता मिळवणे हाच या सणामागचा खरा उद्देश आहे.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने अनेक प्रश्न आपल्या मनात निर्माण होतात, आपण महाशिवरात्रीला उपवास का करतो?या दिवशी पांढरी साडी का परिधान केली जाते?शंकराला कडू धोत्र्याचे फूल आणि तीन पानांचे बेल का अर्पण केले जाते? कपाळावर त्रिपुंड का लावले जाते?पिंडीवर अखंड अभिषेक आणि नारळ वाहण्यामागे कोणते शास्त्र आहे? निराकार शिव परमात्मा भारत भूमीवर कधी अवतरीत होतात या सर्व प्रश्नांची शास्त्रोक्त आणि आध्यात्मिक उत्तरे मिळवण्यासाठी पारनेर येथील कोर्टगल्लीतील सेवाकेंद्राला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन साधना दिदी यांनी केले आहे. ही ईश्वरीय सेवा सर्वांसाठी पूर्णतः विनामूल्य उपलब्ध आहे

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
**प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय,**
**कोर्टगल्ली, पारनेर.**

# माता रमाईच्या त्यागामुळेच आज आम्हाला सोनीयाचा दिवस : रेखा बनसोडे

(समर्थ गांवकरी)
नायगाव प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमूर्ती माता रमाई या आमच्या आदर्श होत्या त्यांच्या त्यागामुळे अपार कष्टामुळे आज आम्हाला सोनियाचे दिवस पहावयास मिळतात ही किमया माता रमाईची आम्हाला कदापि विसरता येणार नाही असे प्रतिपादन अनाथाची आई रेखाताई बनसोडे यांनी आयोजित माता रमाई जयंती महोत्सव कार्यक्रमात व्यक्त केले.

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे महिला मंडळाच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या जयंतीदिनी माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांना वंदन गावचे पोलीस पाटील सतीश पाटील आणेराये यांच्या हस्ते करण्यात आले तर यावेळी प्रत्येकाने माता रमाईच्या प्रथमेश पुष्प अर्पण करून सामूहिक रित्या पंचशील त्रिशरण वंदन घेतल्यानंतर कुमारी चांदणी नामदेव बैलकवाड या विद्यार्थिनीनी अतिशय सुंदर माता रमाई यांच्या जीवन कार्यावर आपले मनोगत व्यक्त केले तर रेखाताई बनसोडे पुढे म्हणाल्या की, कुठल्याही महापुरुषांचा एक इतिहास असतो कारण त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे त्यांची पत्नी उभी राहिल्यामुळेच आज आपल्याला राष्ट्र महापुरुष मिळालेले आहेत तसे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाच्या माध्यमातून आपल्या सर्वांना समान अधिकार प्राप्त करून दिला आहे त्या अधिकारावर आणि त्यांच्या लोकशाहीमुळे आज आपणास सुखाचे दिवस पाहायला मिळतात ही किमया त्यागमूर्ती माता रमाईची आहे म्हणून महिलांनी रमाईचा आदर्श आपल्यासमोर ठेवून आपले जीवन मार्गक्रमण करावे असेही रेखाताई बनसोडे देवकर यांनी म्हणाल्या, यावेळी ललिताबाई वाघमारे जमुनाबाई वाघमारे राधाबाई वाघमारे धृपदाबाई वाघमारे लक्ष्मीबाई वाघमारे छायाबाई वाघमारे मीराबाई वाघमारे, चौऊत्राबाई बैलकवाड,चंद्रकलाबाई वाघमारे चैऊत्राबाई कांबळे कुमारी दीक्षा वाघमारे,कु. राखी बैलकवाड व नागोराव वाघमारे चांदोबा वाघमारे संजय वाघमारे माधव वाघमारे मनोहर वाघमारे यासह अनेकांची उपस्थिती होती.




# महापुरुषांचे त्याग आणि समर्पणातूनच सामाजिक क्रांती शक्य : राजेंद्र करंदीकर

## निघोज येथे महामातांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात संपन्न

(समर्थ गांवकरी)
पारनेर/ प्रतिनिधी

जिजाऊ माँ साहेब, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर,समाजसेविका मुक्ता साळवे, फातिमा शेख या महा मातांनी अतोनात त्याग, बलिदान आणि खडतर परिश्रमातून या देशात स्वराज्य, शिक्षण आणि सामाजिक न्यायाची मशाल पेटवली. त्यांच्या याच संघर्षामुळे आज आपल्याला लोककल्याणकारी संविधान मिळू शकले आहे. त्याग आणि समर्पणाशिवाय कोणतीही सामाजिक क्रांती किंवा व्यवस्था परिवर्तनाची चळवळ यशस्वी होऊ शकत नाही, असे प्रतिपादन 'युनिटी ऑफ मूलनिवासी समाज'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर यांनी केले. प्रथमतः महामातांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी संत साहित्याचे अभ्यासक डॉ रफिक सय्यद, डॉ.प्रमोद हिरभगत, प्रदीप नगरे, सुरेश रोकडे,महेंद्र रोकडे, सुधामती कवाद, प्रणव भालेराव, दिलीप सोनवणे, बाळासाहेब पातारे, हिरामण सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.



कुस्ती, ज्युडो कुराश स्पर्धेत तालुकास्तरीय,जिल्हास्तरीय, विभागीय, तसेच राष्ट्रीय स्तरावर विशेष यश संपादन केल्या बद्दल कु. तन्वी दत्तात्रय सरोदे हिचा ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना करंदीकर यांनी महामातांच्या सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीत स्त्रियांनी आणि महापुरुषांनी जो लढा दिला, तो केवळ सत्तेसाठी नव्हता तर मानवी हक्कांसाठी होता. आजच्या पिढीने हा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी महापुरुषांचे विचार आत्मसात करणे, हाच त्यांच्या जयंतीचा खरा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.या सोहळ्याला संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रफिक सय्यद यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी आपल्या भाषणातून संत परंपरेतील सामाजिक समता, बंधुत्व, न्याय, एकता यांचे विचार मांडले. तसेच कु. रोशनी गायकवाड, कु. मृण्मयी करंदीकर, कु. आर्या तांबे, कु. हर्षता सुर्यवंशी, कु. संबोधी सोनवणे या विद्यार्थिनी भाषणातून महा मातांच्या विचाराचा जागर केला.यावेळी सामाजिक ऐक्य आणि प्रबोधनाचा संदेश देण्यात आला. सूत्रसंचालन हिरामण सोनवणे यांनी केले तर आभार दिलीप सोनवणे यांनी मानले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंडाणे (ओ) येथील वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

(समर्थ गांवकरी)
कुंडाणे (ओ) ता. कळवण

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंडाणे (ओ) येथील वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ७.३० वाजता अत्यंत उत्साही व प्रसन्न वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन व अध्यक्षस्थान ओतूर केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय श्री. आहेर सर यांनी भूषविले. यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाटिका, गीत व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सादरीकरणातील शिस्त व शिक्षकांचे मार्गदर्शन याबाबत उपस्थित मान्यवरांनी मुक्तकंठाने कौतुक केले.

या कार्यक्रमास गावातील तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेला



गावातील सर्व मान्यवरांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळा प्रशासन व शिक्षकवृंदाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व मान्यवरांचे, ग्रामस्थांचे व पालकांचे मनःपूर्वक आभार मानले तसेच भविष्यातही असेच सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# मोखाड्यात कार्यकर्त्यांनी डोक्यावरील केस काढून दादांना वाहीली श्रद्धांजली..

(समर्थ गांवकरी)
पालघर:सौरभ कामडी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांचे विमान अपघातामध्ये निधन झाल्यानंतर संपूर्ण राज्यांवर शोककळा पसरली होती.आजही दादांवर तेवढेच प्रेम करणारे कार्यकर्ते ग्रामीण भागात सुध्दा आहेत.अशातच मोखाड्यातील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार सुनील भुसारा यांच्या मार्गदर्शनाखाली मोखाड्यात काही कार्यकर्त्यांनी अजित दादांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आपल्या डोक्यावरील केस काढीत मुंडण करून श्रद्धांजली वाहिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील त्यांच्या कार्यकर्त्यांप्रमाणे अजित दादा वर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची चांगले नेतृत्व म्हणून निष्ठा होती.त्यामुळे मोखाड्यातून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील तालुका उपाध्यक्ष रामदास कोरडे, कार्यकर्ते रघू पाघारी,गंगा वाघ,नामदेव कोरडे,वासुदेव गवते आदी प्रमुख कार्यकर्त्यांनी ओसरविहरा येथील प्राचीन शिवमंदिराच्या परीसरात आपल्या डोक्यावरील केस काढून मुंडण करुन आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली वाहिली आहे..



# वासुंदे यात्रेची कुस्त्यांच्या हगाम्याने सांगता

## भागवत कथेनंतर कुस्ती हगाम्याने गावकऱ्यांचा उत्साह शिगेला



(समर्थ गांवकरी)
पारनेर/प्रतिनिधी

वासुंदे येथे श्री भाऊसाहेब महाराज यात्रा उत्सवाची सांगता कुस्त्यांच्या हगाम्याने झाली. शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी वासुंदे येथे यात्रा उत्सवानिमित्त कुस्ती स्पर्धांचे आयोजन अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व श्रीक्षेत्र वासुंदे येथील सप्ताह प्रमुख शिवसेना नेते सुजितराव झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेत पारनेर तालुक्यातील तसेच नगर, श्रीगोंदा, जुन्नर, संगमनेर, राहुरी तालुक्यांतील भागातून मोठ्या संख्येने मल्ल सहभागी झाली होते नेत्रदीपक कुस्त्यांनी वासुंदे येथील हगामा गाजला.

ओपन लीग पद्धतीने स्पर्धा झाली या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक बक्षीस उद्योजक संजय साळुंके, द्वितीय क्रमांक बक्षीस उद्योजक दत्तात्रय साळुंके तसेच तृतीय क्रमांक बक्षीस गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे, यांच्या वतीने ठेवण्यात आले. इतर बक्षिसे ही कुस्तीपटूंना देण्यात आली. रोमहर्षक कुस्त्यांनी वासुंदे गावचा आखाडा गाजला. उपस्थित सर्व कुस्तीपटूंचे सुजितराव झावरे पाटील यांनी स्वागत केले.

सप्ताह काळात विकासानंदजी महाराज मिसाळ यांची नऊ दिवस भागवत कथा झाली गुरुवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी मिसाळ महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली सप्ताह काळात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ६ फेब्रुवारी रोजी यात्रोत्सवाची कुस्ती हगाम्याने सांगता झाली.

यावेळी गुरुदत्त पतसंस्था चेअरमन बा. ठ. झावरे, माजी उपसरपंच शंकर बर्वे, उद्योजक संजय साळुंके, भाऊ सैद, सूर्यभान भालेकर, दिलीप पाटोळे, शरद पाटील, अमोल उगले, स्वप्नील झावरे, लक्ष्मण झावरे, अंकुश बर्वे, बाळासाहेब झावरे, पो. मा. झावरे, प्रल्हाद भालेकर सर, इंजि. प्रसाद झावरे, सचिन उगले, संभाजी बर्वे, उद्योजक दत्तात्रय साळुंके, बाळासाहेब झावरे सर, गणेश शिरतार, निवृत्ती बर्वे, अनिल हिंगडे, सागर साळुंके, दत्तात्रय साळुंके, योगेश वाबळे, पोपट हिंगडे, बाळासाहेब वाबळे, खंडू टोपले, भाऊसाहेब झावरे, सुदाम भालके, आदी उपस्थित होते.

वासुंदे येथील भाऊसाहेब महाराज यात्रा ही फक्त धार्मिक उत्सव नाही, तर आमच्या गावातील एकतेचे, पराक्रमाचे आणि परंपरांचे प्रतीक आहे. नऊ दिवस भागवत कथेने मन शुद्ध झाले आणि कुस्ती हगाम्याने शरीर आणि उत्साह जागा झाला. सर्व कुस्तीपटू, भाविक आणि सहभागी यांच्या कष्टाने हा उत्सव यशस्वी झाला. हीच खरी शक्ती आहे.

**सुजित झावरे पाटील (माजी उपाध्यक्ष जि. प. )**

# पाथर्डीत माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी चंपाबाई गाडे यांच्या स्मरणार्थ महिलांना साड्यांचे वाटप

(समर्थ गांवकरी)
पाथर्डी / राजेंद्र चव्हाण

दि.७ फेब्रुवारी रोजी माता रमाई यांच्या जयंतीच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आणि त्या निमित्ताने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने माता भगिनी उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात माता रमाईच्या प्रतिमेची पूजन करून व बौद्धाचार्य भीम राज शिंदे व श्रीपत दादा बळीद, यांनी त्रिशरण पंचशील घेऊन सुरुवात करण्यात आली. यामध्ये माता रमाईच्या जीवन कार्यावर सुंदर प्रबोधन मीनाताई शिंदे, आश्लेषा क्षेत्रे/काळोखे यांनी केले. राजरत्न डोळस, प्रज्ञा आनंद पंडागळे, प्राजक्ता मंगेश शिंदे, श्रेया ढेकणे इत्यादींनी सुंदर माता रमाई यांची गीते गाऊन कार्यक्रमाचे शोभा वाढवली. या कार्यक्रमांमध्ये प्रताप मंगेश मंगेश शिंदे या विद्यार्थ्याने सुंदर भाषण केले. या निमित्ताने चंपाबाई मोहनराव गाडे यांच्या स्मरणार्थ गाडे परिवाराने उपस्थित महिलांना साड्यांचे वाटप केले. त्याचबरोबर डॉ. प्रा. अशोक डोळस यांनी लिहिलेल्या,आजच्या शिक्षणावर बोलू काही या पुस्तकाचे अनावरण व वितरण करण्यात आले.





हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष श्रीपत दादा बळीद, दिलीप सरसे, जगदीश गाडे, प्रा. डॉ.श्रीकांत काळोखे, प्रा.अशोक डोळस, प्रा.घोंगडे, श्रीकांत उर्फ पप्पू शेठ बोर्डे, दिगंबर गाडे, एकनाथ ठोकळ, रामदास सोनवणे, महेंद्र राजगुरु, आनंद पंडागळे, साहेबराव बळीद, कैलास वेलदोडे, रवींद्र कटके, गोरख थोरात परिवार, सखाराम शिरसीम,भीमराव शिरशीम, नाना गवारे, मिलिंद गवारे, राजेंद्र गवारे, भाऊसाहेब गवारे,बौद्धाचार्य कानिफ पटारे , अरुण थोरात, गोरख थोरात, चव्हाण परिवार यांनी सहकार्य केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप सरसे, आभार दिगंबर गाडे तर सूत्रसंचालन गौतम ढेकणे यांनी केले.तसेच या कार्यक्रमांमध्ये मनीषा एकनाथ ठोकळ, विजया वेलदोडे, पुष्पा दिगंबर गाडे, रमा गौतम ढेकणे, मीनाताई सरसे मॅडम, सुनीता बळीद, प्रज्ञा अशोक डोळस, ज्योतीताई आनंद पंडागळे, ज्योतीताई महेंद्र राजगुरू इत्यादी महिला सहभागी झाल्या होत्या.

# श्री क्षेत्र लिंगेश्वर लिंगदेव येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळाचे आयोजन

(समर्थ गांवकरी)
लिंगदेव/प्रतिंनिधी

अकोले तालुक्यातील मुळा नदीवर निसर्गरम्य ठिकाणी वसलेल्या लिंगदेव येथे भगवान लिंगेश्वरांचे जागृत देवस्थान आहे. दरवर्षी याठिकाणी श्रावणमहिना , गुडीपाडवा व महाशिवरात्री निमित्ताने मोठी यात्रा भरते . महाशिवरात्र निमित्ताने सालाबाद प्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मिती माघ वद्य ८ (अष्टमी ) शके १९४७ सोमवार दिनाक ०९ फेब्रुवारी २०२६ ते माघ वद्य १४ शके १९४७ सोमवार दिनाक १६ फेब्रुवारी २०२६ या काळात आयोजन करण्यात आले आहे .या सप्ताह काळात पहाटे ०४ वाजता काकड आरती सकाळी ०७:३० ते ११ वा ज्ञानेश्वरी पारायण दुपारी ०१ ते ०३ भजन सेवा दुपारी ०३:३० ते ०४:३० गाथा भजन सेवा ,सायंकाळी ०४ :३० ते ०५:३० प्रवचन , सायंकाळी ०६ ते ०७ हरिपाठ , रात्री ०८ ते ११ वा किर्तन सेवा चे आयोजन करण्यात आले आहे . या सप्ताह काळात महाराष्ट्रातील नामवंत , गुणवंत किर्तनकार तसेच प्रवचन कार आपली किर्तनरुपी व प्रवचनरुपी सेवा बजावणार आहे .

या सप्ताह काळात प्रथम दिनी ०९ फेब्रवारी २०२६ रोजी युवाकिर्तनकार ह.भ.प राजेंद्र महाराज सदगीर, संगमनेर यांची किर्तनरुपी सेवा तर ह.भ.प प्रदीप महाराज होलगीर, लिंगदेव यांचे प्रवचन तर ह.भ.प जोंधळे महाराज वारकरी शिक्षण संस्था अकोले यांची भजन सेवा , द्वितीय दिनी १० फेब्रवारी २०२६ महंत ह.भ.प प्रमोद महाराज जगताप बारामती किर्तनसेवा ,ह.भ.प अजय महाराज पवार ,लिंगदेव यांची प्रवचन सेवा तर हनुमान प्रासादिक मंडळ ,जामगाव यांची भजन सेवा , तृतीय दिनी ११ फेब्रवारी २०२६ रोजी रामायणाचार्य ह.भ.प उद्धव महाराज चोले, बीड किर्तनसेवा तर ह.भ.प विश्वनाथ महाराज शेटे ,पिंपळगाव खांड यांची प्रवचन सेवा अगस्ती प्रासादिक मंडळ अकोले यांची भजन सेवा ,चतुर्थ दिनी १२ फेब्रवारी २०२६ समाजप्रबोधनकर ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली वाबळे महाराज ,आळंदी यांची किर्तनसेवा तर प्रवचनकार ह.भ प प्रा . बाळासाहेब महाराज शेटे ,अकोले यांची प्रवचन सेवा व केळेश्वर प्रसादिक मंडळ केळी ,ओतुर यांची भजन सेवा , पंचमदिनी १३ फ`ब्रवारी २०२६ भजनसम्राट ह.भ.प परमेश्वर महाराज जायभाय, आळंदी यांची किर्तनसेवा तर प्रवचन ह.भ.प हौशीराम महाराज कोल्हे ,पेमगिरी यांची प्रवचनसेवा श्रीराम प्रासादिक मंडळ, वासाळी यांची भजन सेवा ,षष्टम दिनी १४ फेब्रवारी २०२६ वाणीभुषण ह.भ.प बाळू महाराज गिरगावकर,परभणी यांची किर्तन सेवा तर ह.भ.प परशुराम महाराज कानवडे यांची प्रवचन सेवा व हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, शेरेवाडी यांची भजन सेवा, सप्तम दिनी १५ फेब्रवारी २०२६ सायंकाळी ०५ वा पालखी नगर प्रदक्षिणा महाशिवरात्र निमित्ताने गाथामुर्ती ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज कदम ( मोठे माऊली) आळंदी यांची किर्तन सेवा तर हनुमान प्रासादिक भजनीमंडळ ,लहित बु यांची भजन सेवा , अष्टम दिनी १६ फेब्रवारी २०२६ गुरुवर्य ह.भ.प माधव महाराज घुले ,इगतपुरी यांचे सकाळी ०९ ते ११ वा काल्याचे किर्तन होणार आहे .या सप्ताह काळात संगीत साथ मृदुंगाचार्य






ह.भ.प शांताराम महाराज पापळ , ह.भ.प सचीन महाराज चौधरी , ह.भ.प विनायक महाराज शेटे , ,गायनाचार्य ह.भ.प शांताराम महाराज कोल्हाळ, ह.भ.प अशोक महाराज लांडे ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज बैरागी , ह.भ.प भगवान महाराज बर्डे , ह.भ.प गोविंद महाराज कदम ह.भ.प यादव महाराज हाडवळे ह.भ.प दत्तु महाराज शेळके , ह.भ.प नारायण महाराज चौधरी ह.भ.प स्वप्नील महाराज चौधरी,ह.भ.प एकनाथ महाराज बोऱ्हाडे , ह.भ.प मारुती महाराज बोऱ्हाडे ,ह.भ.प अनिल महाराज रकटे ,ह.भ.प मनोज महाराज बैरागी ,काकडा व भजन नेतृत्व ह.भ.प बाळासाहेब महाराज हाडवळे , ह.भ.प बाळासाहेब महाराज रंधे ,ह.भ.प निवृत्ती महाराज होलगीर , ह.भ.प महेश महाराज फापाळे , ह.भ.प रामभाऊ महाराज हाडवळे , ह.भ.प भाऊसाहेब महाराज फापाळे , ह.भ.प सार्थक महाराज फापाळे , ह.भ.प रेवगडे ताई , ह.भ.प कलाबाई खंडागळे , ह.भ.प हिराबाई फापाळे ,चोपदार ह.भ.प रखमाजी महाराज हाडवळे , ह.भ.प आत्माराम महाराज पवार , ह.भ.प भूषण महाराज कोरडे ,सांगीतिक सहकार्य ,श्री लिंगेश्वर वारकरी शिक्षण संस्था ,लिंगदेव ,जोंधळे महाराज वारकरी शिक्षण संस्था अकोले ,विणेकरी ह.भ.प कारभारी महाराज कोरडे ,पुष्प हार सहकार्य श्री लिंगेश्वर फ्लावर्स कंपनी लिंगदेव सागर सोपान फापाळे ,वस्त्र सहकार्य आकांक्षा क्लॉथ स्टोअर्स अनिल रामभाऊ हाडवळे ,ग्रंथराज ज्ञानेश्वर पारायण नेतृत्व ह.भ.पप्रदीप महाराज होलगीर , ह.भ.प अशोक महाराज कोल्हाळ ,श्री त्र्यंबकेश्वर ते श्री लिंगेश्वर भक्तीज्योत व्यवस्थापन श्री.नागेश्वर सेवा मंडळ ,लिंगदेव ,भाक्तीज्योत अन्नदान सेवा ,गोपाल सोपान हाडवळे ,महेश शिवाजी हाडवळे ,सागर गेनुभाऊ कानवडे ,ऋषिकेश दगडू पवार ,मिलिंद ज्ञानेदव ढोकरे ,मच्छिंद्र सुदाम फापाळे ,गणेश बाळासाहेब कानवडे ,नंदादीप सहकार्य रामभाऊ अर्जुना कानवडे ,बन्सी म्हातारबा होलगीर ,भाऊसाहेब भागा फापाळे ,दत्तु किसन फापाळे ,जालिंदर सखाहारी फापाळे ,गोरख रखमा फापाळे ,महाशिवरात्र फराळ व्यवस्था अशोक तुकाराम फापाळे ,जानकीराम भाऊ हाडवळे ,संजय उत्तम हाडवळे ,विपुल ललितकुमार शहा

या सप्ताह काळात गावातील नामवंत व्यक्तींनी महाप्रसाद योगदान दिले आहे विशेष देणगीदार ऋषिकेश रमेश हाडवळे यांनी ६१००० रुपये ,सोमनाथ भिवाजी हांडे यांनी २१००० रुपये ,मे महेश शेठ जाजू १५००० रुपये विशेष देणगी दिली आहे.युवा उद्योजक भागवत पुंजा घोमल ,डॉ अभिजित फापाळे भाजीपाला सहकार्य गोविंद यादव हाडवळे व गावातील दानशूर व्यक्तींनी विशेष सहकार्य केले आहे .हा सप्ताहाचा अकोले तालुका व लिंगदेव पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे देवस्थानचे अध्यक्ष डी.बी फापाळे , उपाध्यक्ष दत्तु माधव कानवडे ,सचिव पंढरीनाथ जाधव विश्वस्त रामकृष्ण कानवडे , दत्तु फापाळे ,सदाशिव कानवडे ,सुरेश कानवडे ,एकनाथ कोरडे ,एकनाथ कानवडे ,सुदाम हांडे,भाऊसाहेब हाडवळे ,भाऊसाहेब पवार हरिभाऊ फापाळे ,बाळशिराम आढाव ,बन्शी कानवडे,सुनील शहा,कैलास फापाळे आदींनी आवाहन केले.

**हरिभाऊ फापाळे**
**९३७१८०६०८३**